# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ७.७.२००५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

गुरूवार दिनांक ७.७.२००५ रोजी मा.महापौर श्री.किशनचंद लेखराज तणवानी यांच अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मूख्य कार्यालयातील ''प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दूपारी ४.४५ वाजता ''वंदेमातरम्''या गिताने सूरू झाली सभेला मा.आयूक्त तसेच संबधीत अधिकारी व खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.भगवान घडमोडे
०२. स.स.श्री.काशिनाथ कोकाटे
०३. स.स.श्री.संजय शिरसाट
०४. स.स.श्री.तरविंदरसिंग धिल्लन
०५. स.स.श्री.बम्हणे पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०९. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
१०. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
११. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
१२. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
१३. स.स.श्रीमती पाटील अलका रमेश
१४. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१५. स.स.सौ.मसरत बेगम शरफोद्दीन
१६. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१७. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१८. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१९. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
२०. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२१. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगलाल
२२. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२३. स.स.सौ.इंगळे शंकुतला सांडुजी
२४. स.स.श्रीमती शिंदे मिराबाई रामराव
२५. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२६. स.स.सौ.खान मेहेरून्नीसा खान हमीद
२७. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
२८. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
२९. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
३०. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्यीन
३१. स.स.श्री.अ.रशिद खान मामु
३२. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल

३३. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
३४. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३५. स.स.श्री.खान कैसर बद्रोद्दीन
३६. स.स.सौ.कुरैशी नजमा बेगम युनूस
३७. स.स.श्री.खान मुजीब मीर आलम खान
३८. स.स.श्री.खान निसार मो.खान
३९. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
४०. स.स.सौ.खान आबेदा बेगम गुलाब खान
४१. स.स.श्री.बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
४२. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४३. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४४. स.स.श्री.अमोदी अबुबकर बिन सईद
४५. स.स.सौ.शेख शमशाद बेगम शेख हफिज
४६. स.स.श्री.जेजुरकर संतोष सुधाकरराव
४७. स.स.श्री.मोतीवाला अशरफ मो.युनूस
४८. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
४९. स.स.श्री.कटकटे सतीष विश्वनाथ
५०. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
५१. स.स.श्री.कराड भागवत किसनराव
५२. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५३. स.स.श्री.वैद्य रेणुकादास दत्तोपंत
५४. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५५. स.स.सौ.महाजन मनिषा अमर
५६. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५७. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
५८. स.स.श्रीमती डॉ.बिनवडे आशा उत्तम
५९. स.स.श्री.खुडे विजय किसन
६०. स.स.श्री.खेंडके संतोष सर्जेराव
६१. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
६२. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
६३. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
६४. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
६५. स.स.श्री.कावडे साहेबराव राणुबा
६६. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६७. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६८. स.स.श्रीमती वाघमारे पार्वताबाई विजय
६९. स.स.सौ.जाधव संगिता विठ्ठलराव
७०. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
७१. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
७२. स.स.सौ.खंदारे वंदना प्रकाश
७३. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
७४. स.स.श्री.जोशी संजय रामदास

७५. स.स.सौ.रहाटकर विजया किशोर
७६. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
७७. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
७८. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
७९. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन
८०. स.स.सौ.मोमीन सफीया फिरदोस
८१. स.स.सौ.घोडेले अनिता नंदकुमार

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.संजय किसनराव केनेकर
०२. स.स.श्री.किशोर बाबुलाल तुलशीबागवाले
०३. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल
०४. स.स.श्री.सुरेंद्र कुलकर्णी

**संवाद :**

श्री.भागवत कराड : दोनच दिवसापूर्वी अयोध्या येथे राममंदीरांवर हल्ला करण्यात आला त्याचा निषेध करण्यात येतो तेथे दोन जवान शहीद झाले असून त्यांना या सभागृहातर्फे श्रध्दाजंली अर्पण करण्यात यावी.

श्री.मूजीब खॉन : पाणी प्रश्नावर ८ दिवसात बैठक आयोजीत करणार होते बैठक घेण्यात आलेली नाही.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: माजी नगरसेवक व या सभागृहाचे माजी सभापती व माजी राज्यमंत्री श्री गंगाधर गाडे यांचे वडील स्व. सुखदेव गाडे यांचे नुकतेच निधन झालेले आहे त्यांनाही सभागृहातफे श्रध्दाजंली अर्पण करण्यात यावी.

श्री.भागवत कराड : यास माझे अनूमोदन आहे.

श्री.संजय सिरसाट : या शहरात ज्या कूण्या नागरीकांचा मृत्यू झाला असेल त्या सर्वांना या सभागृहात श्रध्दाजंली अर्पण केली पाहिजे . पूण्याला अशी पध्दत आहे.प्रत्येक सर्वसाधारण सभा संपल्यानंतर पूढील सभेपर्यंत ज्यांचा कुणाचा मृत्यू झाला असेल त्यांना श्रध्दाजंली अर्पण करत जावी.अशी माझी सूचना आहे.

डॉ.भागवत कराड : ज्याचा या सभागृहाशी संबध आहे किंवा होता त्यांचे संबधीच्या बाबतीत ठराव पारीत करण्याची गरज आहे स.श्री.गाडे गंगाधर हे या सभागृहाचे सदस्य होते म्हणून त्यांचे वडीलांना श्रध्दाजंली अर्पण करण्यात यावी .

श्री.संजय सिरसाट : प्रत्येक नागरीक या सभागृहाशी संबधीत आहे वेगळे असे काही नाही नागरीकांनीच सदस्याना निवडून दिलेले आहे.

मा.महापौर : अयोध्या येथे अतिरिकी हल्ल्याचा निषेध करण्यात येतो तसेच तेथे दोन जवान शहीद झाले त्यांना व स्व. सूकदेव गाडे यांचे दु:खद निधन झाले त्यांना श्रध्दाजंली अर्पण करणयासाठी सर्वांनी उभे रहावे.

(याच वेळी आयोध्या येथील दोन शहीद जवान तसेच स्व.सुखदेव गाडे यांचे दु:खद निधन झाले त्यांना सभागृहातर्फे दोन मिनिटे श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.)

मा.महापौर :पाणी प्रश्नावर विशेष बैठक घेणार होतो परंतू काही अडचणीमूळे बैठक घेऊ शकलो नाही.तर आजच्या बैठकीत एक तास अगोदर पाणी प्रश्नावर चर्चा करावी अशी सभागृहाला विनंती आहे.

श्री.संजय केनेकर : दिं.६.६.२००५ रोजी वर्ग-४ संवर्गातील पदाच्या लेखी परीक्षा घेण्यात आल्या काही उमेदवारांना हेतूपूरस्सर डावलले त्यांना कॉल लेटर दिले नाही.

मा.सभापती : स.सदस्य आपला विषय वेगळा आहे अगोदर पाणी प्रश्नावर चर्चा करावी.

श्री.महेश माळवतकर : पाणी प्रश्नावर चर्चा होणे अपेक्षीत आहे. सर्व पदाधिकारी यांनी गेल्या महिण्यात सिडकोच्या प्रश्ना संदर्भात विविध बैठका आयोजीत करून तेथील वितरण व्यवस्था सुधारणा करण्याचा प्रयत्न केला त्याबध्दल सर्व पदाधिकाऱ्यांचे मी सभागृहाच्या वतीने व सिडको नागरीकांच्या वतीने अभिनंदन करतो.पाणी पूरवठयात सूधारणा झालेली आहे.याच बरोबर प्रशासनाचे सूध्दा अभिनंदन करतो.१९ मे च्या बैठकीत एक प्रस्ताव प्रशासनानेसादर करण्याचे ठरविले होते.आता उन्हाळयाचे दिवस नाही परंतू पून्हा ७-८ महिन्यानंतर उन्हाळा येणार आहे लोडशेडींग सध्या कमी झालेली आहे पून्हा उन्हाळा आल्यानंतर लोड शेडींगचा प्रश्न उपस्थित होईल व सिडको हडको भागात पून्हा पाणीपूरवठा कमी होउ शकतो प्रस्ताव असा होता की सर्व पंपीग सेंटरही लोडशेडींग पासून मूक्त केली जाईल ८ कोटीचा तो प्रस्ताव होता.दोन महीण्यात काय पाठपूरावा केला पावसाळा आला म्हणून त्याकडे दूर्लक्ष होता कामा नये पूढील उन्हाळयात लोडशेडींगचे कारण दाखवू नये असाच पाणी पूरवठा सूरळीत राहण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावे पाणी पूरवठयात सूधारणा झालेली आहे ती तात्पूरती न करता कायम स्वरूपी करावी.

सौ.रजनी जोशी : हडको भागात पाणी वेळेवर येत नाही.

श्री.भागवत कराड : एक स.सदस्य यांनी आताच अभिनंदन केले परंतू सिडको हडको भागात जशी पाणी पूरवठयात सूधारणा झाली त्याप्रमाणे शहरात सूध्दा करावी त्या भागाचे नगरसेवकही सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदनकरतील पाणी पूरवठयात सूधारणा होण्याच्या दृष्टीने प्रशासनास तशा सूचना कराव्यात.

श्री.कवरसींग बैनाडे :स.सदस्य श्री माळवतकर यांनी जे मत व्यक्त केले त्यास मी सहमत आहे गेल्या दोन तीन महिण्यात सिडको भागात पाण्याचा तूटवडा होता परंतू मागील काही दिवसापासून कूणाचीही तक्रार पाणया विषयी नाही दूरध्वनी येत नाही मी सूध्दा माझया वतीने पदाधिकारी यांचे अभिनंदन करतो व कायम स्वरूपी असेच पाणी याचे यासाठी प्रयत्न करावे.

सौ.जोशी रजनी : सिडको भागाचा प्रशन सूटला असेल आम्ही हडको भागात राहतो पाणी कमी दाबाने येते माझ्या वार्डात पाणी कमी दाबाने येते वेळेवर येत नसून नागरीकाचे निवेदन माझ्याकडे आहे त्यांनी या निवेदनावर सहया केलेल्या आहे(निवेदनाची प्रत मा.महापौर यांचेकडे देतात.)पाणी जास्त प्रमाणात देत नसेल तर पाणी पट्टी कमी करावी. अशी मागणी नागरीकांची आहे ४० मिनीटेच पाणी येते कमी दाबाने येत असून वेळेवर येत नाही अभिनंदन करणया सारखे काही यात नाही महीलाचा पाणी भरण्याचा संबध असतो महीलांनाच पाणी भरावे लागते प्रत्यक्ष वार्डात पाहणी करावी परीस्थिती कळेल.

श्री.कवरसिंग बैनाडे :एखादया प्रभागातील एखादी गल्ली मधे पाणी जास्त मिळत नसेल परंतूसर्वच वार्डात पाणी पूरवठा होत नाही अशी परीस्थिती नाही पाणी पूरवठयात सूधारणा झालेली आहे अधिकारी, पदाधिकारी यांचे अभिनंदन केलेले योग्य आहे एखादया विदयार्थ्यानी चांगले गूण घेतले तर कौतूक होते अधिकाऱ्यानी चांगले काम केल्यास त्यांचे कौतूक करणे आवश्यक आहे.

श्री.दिलीप गायकवाड :स.सदस्या सौ.जोशी यांनी जे मत व्यक्त केले त्यास माझी सम्मती आहे मी ही हडको भागाचा नगरसेवक आहे माझया वार्डात महिला माता यांना डोक्यावर हंडा घेउन पाण्यासाठी फिरावे लागते पाणी येत नाही स.सदस्यश्री. माळवतकरश्री.बैनाडे बोलले त्यांनी त्यांचेशब्द परत घ्यावे.

श्री.संजय जोशी : पैठण पासून ते फारोळया पर्यत दोनलाईन येतात यासाठी १६७ कोटीच्या योजनेचा अहवाल बनवला होता एक १२०० एमएम व ८०० एमएम ची पाईप लाईन येते या लाईनला २०-२५ वर्ष झालेले असून जे आयुष्यमान असते ते पूर्णत: संपलेले आहे १२०० एमएम ची लाईन मधून १००० एमएम लाईनचे इनपुट येत नाही तर ८०० एमएम च्या लाईन मधून ५०० ते ६०० एमएम लाईनइतके पाणी येते.पैठण पासून फारोळया पर्यत लाईन न टाकता शहरात नवीन टाक्या कशासाठी तयार केल्या खुलासा करण्यात यावा जर विहीरीतच नाही तर पोहऱ्यात कोठून येणार गेल्या उन्हाळयात पाण्यासाठी मोठया अडचणीला तोंड दयावे लागले पूढील उन्हाळयापर्यत ही पाईप लाईन केली नाही तर या शहराला आवशयक तितका पाणी पूरवठा होणार नाही पैठण धरणाचे पाणी दिसेल परंतू आणता येणार नाही अशी परीस्थिती होउ शकेल यासाठी प्रथम नवीन पाईपलाईन टाकावी नंतर इतर सुविधा कराव्यात १९९१ च्या अगोदर पाण्याच्या लाईन टाकल्या गेल्या तेव्हढेच पाणी आज शहरात येते १९९१ पासून या शहराची लोकसंखया चारपट झालेली आहे पाणी पूरवठयात वाढ करण्यासाठी प्रशासनाने काडीमात्र प्रयत्न केलेले नाही ही अत्यंत दूर्दैवाची बाब आहे.

मा.महापौर : प्रशासनाने खुलासा करावा.

कार्यकारीअभियंता(पापू): शहराला पाणी येण्यासाठी जायकवाडी पासून १२०० मी.मी. व दूसरी एक ७०० मी.मी.व्यासाची समांतर जलवाहीनी टाकलेली आहे. यापूर्वी १२० ते १२२ एमएलडी पाणी येत होते मागच्या वर्षी ७१४ लक्षची योजना मंजूर करण्यात आलेली होती त्यामधे जायकवाडी नवीन पंप गृह जूने पंपगृह ढोरकीन फारोळा नक्षत्रवाडी येथे विविध प्रकारचे नवीन पंप बसविण्यात आले. पंप बसविल्यामूळे आज स्थितीत १३३ एमएलडी पाणी शहरात येते पंप बसविणयाचे काम २ ते ३ महीण्यात पूर्ण होईल त्यानंतर १४२ एमएलडी पाणी साधारणत: या शहरासाठी मिळेल सन १९९७-९८ मधे ६७ कोटीची योजना मंजूर केलेली होती व २००१ वर्षापर्यत अमलात येणार होती आणि त्यापासून ६५ एमएलडी पाणी वाढणार होते ती योजना अदयाप पूर्ण झालेली नसून पाणीपूरवठयात वाढ झालेली नाही.६७ कोटीच्यायोजनेनूसार २०११ पर्यत च्या होणा-या लोकसंख्येला पाणीपूरवठा होउ शकला असता त्यानंतर पॅरलल लाईन टाकणार होतो नवीन पॅरलल लाईन टाकण्यासाठी मा.आयूक्त यांनी मान्यता दिलेली आहे ४ ते ५ दिवसात टेडर कॉल करणार आहोत कन्सल्टन्ट नियूक्त करून त्यांचेकडून सर्वेचे काम करून २०३१ पर्यत होणा-या लोकसंख्येला लागेल तेव्हढे पाणी उपलब्ध होण्यासाठीचा नवीन पाईपलाईन टाकण्याचा प्रस्ताव तयार होत आहे सर्वे करून त्यासाठी लागणारे फंडस् उपलब्ध करून देण्यात येईल.

श्री.संजय जोशी :६७ कोटीची योजना पूर्ण झाल्यानंतर टाक्या बांधावयास पाहिजे होत्या असे माझे मत आहे.

श्री.भागवत कराड : १२०० एमएम व ७०० एमएमची जी पाईप लाईन आहे त्यामधून पूर्ण व्यासनूसार पाणी येत नाही १३० एमएलडी जे पाणी येते ते फक्त ६० ते ७० टक्केच आहे असे माझे मत आहे शासनाचे पत्र सूध्दा होते की पूर्ण पाईप भरून पाणी पंप केले तर पाईप लाईन फूटण्याची भितीर आहे १२०० एमएम व ७०० एमएम च्या पाईप लाईन मधून किती पाणी येते व १००टक्के पाणी पूरवठा त्या पाईपलाईनद्वारे करायचा झाल्यास त्या लाईन योग्य आहेत का?

कार्य.अभियंता(पापू) : आजच्या स्थितीत पाईपचया पूर्ण कॅपॅसीटीनूसार पाणी पंप करीत आहोत.

शासनाकडून महापालिकेस तसे कोणतेही पत्र प्राप्त नाही.

श्री.मूजीब खॉन : नवीन नगरसेवक यांचा ३ महिण्याचा कार्यकाळ गेलेला आहे प्रत्येक नगरसेवकांनी पाणी प्रश्नाबाबत पत्र दिले परंतू अधिकारी दखल घेत नाही पत्र दिल्यानंतर कोणी अधिकारी प्रत्यक्ष स्थळ पाहणीस ३ महिण्यात आलेले नाही. मूजीब कॉलनी मकसूद कॉलनी मधे आज पर्यत पाणी आले मी या बाबतीत ५ पत्र दिले अधिकारी यात प्रत्यक्ष भेट घेतली मा.आयूक्त यांना सूध्दा भेटलो परंतू कोणी स्थळ पाहणी करून पाणी समस्या बाबत विचारणा केलेली नाही.

मा.महापौर : कोणत्याही स.नगरसेवकांनी पत्र दिल्यानंतर ८ दिवसात दखल घेऊन तसा लेखी खुलासा स.सदस्यांना देण्यात यावा याची दखल यापूढे प्रशासनाने घ्यावी.

श्री.मूजीब खॉन : बुढ्ढीलाईन तेरोषनगेट किराडपूरा पर्यत हर्सूल येथून पाणी पूरवठा होतो त्या पॅरलल लाईन संबधी काय कार्यवाही प्रशासनाने केलेली आहे शहागंज टाकी ते नेहरूनगर पर्यत एक लाईन टाकण्याचे काम अर्धवट सोडण्यात आले आजपर्यत का काम थांबलेले आहे खुलासा करावा.

कार्यकारी अभियंता(पापू): जी पाईपलाईन होती त्या पाईपलाईने ग्रॅव्हेटीने पाणीपूरवठा करीत होतो ती सध्या बंद आहे पंपीगद्वारे पाणी पूरवठा करीत आहे.

श्री.मुजीब खॉन : शहागंज ते नेहरूनगर टाकी पर्यत एक पाण्याची लाईन टाकणयाचे काम सूरू होते चंपा मज्जीद पर्यत काम केले त्यानंतर बंद करण्यात आले ५ वर्षापेक्षा जास्त कालावधी गेलेला आहे काम पूर्ण का केले नाही.

कार्यकारी अभियंता(पापू): या संदर्भात मला माहिती नाही दोन दिवसात खुलासा देण्यात येईल.

मा.महापौर : मा.आयूक्त यांनी याबाबतीत चौकशी करून दोन दिवसात माझ्याकडे व संबंधीत स. नगरसेवकांना माहिती द्यावी.

श्री.मुजीब खॉन : मूजीब कॉलनी रोषणगेट शरीफ कॉलनी,मकसूद कॉलनी,यूनूस कॉलनी,आसम कॉलनी भागात पाण्याची मोठी टंचाई आहे ५-६ वेळेस पत्र देऊनही दखल घेतली नाही ७-८ दिवसापासून पाणी येत नाही.

कार्यकारी अभियंता(पापू):सिकदंर पार्क येथे कमी दाबाने पाणी येत होते तसे पत्रानूसार तेथील प्रश्न सोडविलेला आहे.

श्री.मुजीब खॉन : कोणतेही अधिकारी कर्मचारी काम करण्यास आलेले नाही अधिकारी दिशाभूल करीत आहे मा.महापौर आपण पाहणी करू शकता कोणतेही काम केलेले नाही रात्री १२.०० , १.०० वाजता पाणी सोड्ल्या जाते.

मा.महापौर : स.सदस्य श्री मूजीब खॉन यांनी जे पत्र दिले त्याचा लेखी खुलासा दयावा तसेच तेज्या भागात कॉलनीच्या पाणी प्रश्ना संदर्भात सूचना केली संबधीत अधिकारी यांनी स.सदस्य यांना सोबत घेऊन त्या कॉलनीसाठी पाणी पूरवठा ८ दिवसात सूरळीत करून दयावा.

श्री.मुजीब खॉन :शहागंज येथील टाकीवर दोन टॅंकर दयावे व तेथून ज्या भागासाठी पाणीपूरवठा होत नाही अशा भागात टॅंकरद्वारे पाणीपूरवठा करू शकतो या संदर्भात पत्र दिले काहीच कार्यवाही केलेली नाही.

मा.महापौर : प्रशासनाने या बाबतीत दखल घ्यावी लवकरात लवकर शहागंज येथील टाकीसाठी दोन टॅंकर उपलब्ध करून देणयाचे प्रयत्न करावे.

श्री.मूजीब खॉन :जसे पैठण ते फारोळा पर्यत पॅरलल पाईप टाकण्याचा प्रस्तावे येत आहे त्याच प्रमाणे हर्सूल पासून शहरापर्यत पॅरलल पाईप लाईन टाकण्यात यावी.

श्री.रेणूकादास वैद्य :एकच शहर असतांना काही भागात दररोज पाणी तर काहीभागात एक दिवसाआड पाणी येते.असा दूजाभाव का पाणी हा जिव्हाळयाचा प्रश्न असून मोठया प्रमाणात

यासाठी बजेट ठेवण्यात येते.बजेट योग्य रितीने खर्च होते किंवा नाही याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष दिसून येते. क्रांतीचौक येथील पाणयाच्या टाकीवरील जावक रजिस्टरचा मी अभ्यास केलेला आहे तेथील रजिस्टरचे झेरॉक्स आपणाकडे सादर करीत आहे.त्यावर आपण अभ्यास केला तर या रजिस्टरवर दिनांक १.१.०५ ते २४.६.२००५ पर्यतचे जावक क्रमांक टाकलेले आहे यात १ ते ५८२ नंबर आहेत यात ४९ ठिकाणी जागा रिकाम्याच सोडलेल्या आहेत. त्यापैकी १५ ठिकाणी दोनदोन वेळेस लिखान करण्यात आलेले आहे एकाच बाबीला दोन दोन नंबर टाकलेले आहे आधी कोरे नंबर साठी जागा सोडली नतंर डबल नंबर लिहिण्यात आलेले आहे हे सर्व कामे देखभाल व दूरूस्तीची आहेत यावरून असे दिसून येते की काम कोणतेच करायचे नाही ४-५ महीण्यानंतर कामाची नोंद करायची व बोगस बिले काढायची असे सर्रासपणे पाणी पूरवठा विभागात काम चालू आहे याची गंभीर दखल घेवून चौकशी करावी व संबधीतास निलंबीत करावे.

मा.महापौर : मा.आयुक्त यांनी या बाबतीत कार्यवाही करावी.

श्रीमती अलका पाटील : माझ्या वार्डात पाणचंक्की नुरकॉलनी भागात कमी दाबाने पाणी मिळत आहे ते सूरळीत करावे तसेच पैठण जलाशयात भरपूर पाणी आहे असा खुलासा अधिकारी करतात परंतु शहरातील पाणपोई संपूर्ण कोरडया आहेत यात पाणी सोडण्यात यावे नागरीक त्याचा लाभ घेतील.

सौ.पार्वतीबाई वाघमारे : पूंडलीकनगर भागातून एक पाईपलाईन टाकण्यात आली अर्धवट झालेली आहे येणारे पाणी पूंडलीगनगरचे लोक घेतात. सदरची पाईपलाईन गजानन नगर भागासाठी जोडण्यात यावी तसेच पाण्याचे टँकर येतात किमान दोन वेगवेगळया ठिकाणी उभे करावयास पाहिजे परंतू तसे होत नाही एकाच ठिकाणी टँकर उभे करतात महीला सोबत वाहन चालक चांगली वागणूक देत नाही महीला सोबत वाद घालतात एकाच ठिकाणी टँकर उभे करीत असल्यामूळे पाणी आणण्यासाठी खूप त्रास होतो या संदर्भात काल १०-१५ महीला माझ्याकडे आल्या होत्या याची दखल घ्यावी तसेच वार्डात सधया चिखल झालेला आहे मूरूम टाकण्यात यावा.

श्री.मो.जावेद इसाक : माझ्या वार्डात मजनूहील भागात एक पाण्याची टाकी करण्यात यावी म्हणून मी २०-२५ दिवसा पूर्वी पत्र दिले होते त्या संदर्भात काय कार्यवाही करण्यात आली खूलासा दयावा.

मा.महापौर : स. सदस्य यांना ८ दिवसात प्रशासनाने लेखी खुलासा देण्यात यावा.

श्री.सतीश कटकटे : खोकडपूरा भागात बऱ्याच दिवसापासून पाणी येत नाही तेथे लाईनमन नाही एक महीन्यापासून लाईनमन नाही.

कार्य.अभियंता (पापू) : दूसऱ्या लाईनमन मार्फत पाणी पूरवठा सूरळीत ठेवला आहे.

श्री.सतीश कटकटे : नियमीत वेळेत पाणी सोडण्यात येत नाही रात्री बेरात्री पाणीपूरवठा केला जातो नागरीकांना त्रास होतो राकडीया हनमान कॉलनी ते विदया वर्धीनी हायस्कूल पर्यंत नवीन पाईप लाईन टाकण्यात आलेली असून ती अदयाप चाले केलेली नाही वांरवार पत्र देऊन सुध्दा कार्यवाही केली नाही.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर : नंदनवन कॉलनी हा भाग संपूर्ण लिगल असून या भागात पदमपाणी गृहनिर्माण संस्था असून तेथे उदयान रस्ते तसेच लाईटची व्यवस्था असतांना पाण्याची व्यवस्था केलेली नाही ड्रेनेज लाईनचे काम केलेले नाही तरी तात्काळ पाण्याची पाईपलाईन टाकून व्यवस्था करावी तसेच आशानगर भागात ड्रेंनेज व पाण्याची पाईपचे पाणी एकत्र होते आरोग्यास धोका होवू शकतो हे काम करण्यासाठी नागरीकांना मी आश्वासन दिलेले आहे काम केले नाही तर लोक अंदालन करतील

मोर्चे वगैरे काढतील दखल घ्यावी.

मा.महापौर : आताच सूचना केल्या प्रमाणे या भागात पाण्याची लाईन टाकण्यासाठी तसा बजेटमध्ये प्रस्ताव प्रशासनाने ठेवावा.

सौ.हर्षमाला पाटणी : वार्डात पाण्याची लाईन खूपच जूनी असल्यामूळे कमी प्रमाणात पाणी येते मित्रनगर विष्णूनगर भागात मोठया व्यासाची जलवाहीनी टाकण्याची व्यवस्था करण्यात यावी.

सौ.नजमा कुरैशी : वार्ड क्र ५३ मधे एक महीण्या पासून ड्रेनेजचे घाण पाणी वाहत नळाला पाणी येत नाही या संदर्भात प्रशासनास पत्र ही दिले आहे आतापर्यंत कार्यवाही नाही तसेच वार्डातील संपूर्ण ट्रीट लाईट बंद आहेत.

श्री.संजु रिडलॉन : गांधीनगर भागात बापूनगर म्हणून एक भाग आहे तेथे पाण्याची गंभीर समस्या आहे सकाळी ८ ते १० या वेळात पाणी सोडण्याची वेळ होती १ महीण्यापासून लाईनमन नाही थेंब भर पाणी येत नाही या संदर्भात अनेक वेळा पत्र दिले कोणीही अधिकारी आलेले नाही.

कार्य.अभियंता(पापू) : एक लाईनमन कमी आहे एक लाईनमन क्रांतीचौक येथील निलंबीत केलेले आहे तसेच एक लाईनमन सेवा निवृत्त झालेले आहेत या भागात बदली लाईनमन देवून काम करून घेण्यात येत आहे काही लाईनमन फारोळा येथून घेत आहोत एक दोन दिवसात देण्यात येईल.

श्री.संजु रिउलॉन : गूरूद्वारगेटपासून सिंधी कॉलनी मित्रनगर भागात टाकण्यात आलेली लाईन नेहमीच फुटत आहे त्यामूळे नाथनगर पंचशील नगर भागात पाणी येत नाही १५ दिवसापासून १०-१५मिनिटे पाणी येते.

कार्य.अभियंता(पापू) :जून्या पाईप लाईनला नवीन पॅरलल पाईप लाईन टाकण्यात आलेली आहे टेस्टीग धेत असतांना पाईपलाईन फुटलेली आहे म्हणून नवीन पाईपचे कनेक्शन बंद करून पून्हा जून्याच पाईपलाईन द्वारे पाणी पूरवठा होत आहे पूर्ण टेस्टींगचे काम झाल्यानंतर ती पाईपलाईन शिफ्ट करण्यात येईल ३ दिवसात काम पूर्ण होईल.

श्री.वसंत नरवडे : शहरात व वार्डात पाणी सोउण्याच्या वेळ बदलण्यात आलेल्या असून सर्वसामान्य महीला हया १० वाजेच्या आत कामाला जातात म्हणून महीलांची अशी मागणी आहे की सकाळी १० वाजेच्या आत पाणी पूरवठा झाला पाहिजे.किती ही तक्रारी या विभागाकउे केल्या तरी दखल घेतली जात नाही यासाठी मा.आयूक्त व आपण सकाळी पाणी सोडण्याच्या वेळात प्रत्यक्ष त्या भागात भेट दिली पाहिजे.कर्मचारी. उपअभियंता कोठे हे दिसून येईल अधिकारी फोन बंद करून ठेवतात सर्वच ठिकाणचे फोन बंद दिसून येतात. पाणी पूरठा विभागावर नियत्रन ठेवल्या शिवाय जनतेचया समस्या सूटनार नाही फोन केला असता बंद असतात घरचे फोन सूध्दा बंद मोबाईल बंद . प्रत्येक झोनमधे एक तरी तक्रार नगरसेवक सकाळी पाण्याच्या बाबत येतात झोनवर वॉल सोडणारे कर्मचारी सुध्दा नसतात मागिल बैठकीत या विषयावर चर्चा झालेली होती पाणी पूरवठा विभागात मरगळ आलेली आहे.१०-१५ वर्षापासून एकाच ठिकाणी कर्मचारी काम करतात त्यांचे बदल्या करण्यात याव्यात तेथे नवीन कर्मचारी नियूक्त करावे पाणी पूरवठयात बोगस बिले बघायला मिळतील मा.आयूक्त यांनी दखल घ्यावी एक लहानसा खड्डा केला काम कोणतेही करीत नाही बिल मात्र अंदा होते माझ्या घरासमोर घाण पाणी येते अदयाप प्रश्न सुटलेला नाही गटारीमधील नळ जर लिकेज असेल पाणी सोडण्याची वेळ संपल्यानंतर त्यामधे घाण जमा होते हे शोधनेच या विभागाकडून होत नाही समज दिली पत्र दिले कार्यवाही होत नाही

पाणीपूरवठा विभागाच्या विस्कळीतपणामूळे हे सर्व काही घडत आहे पाणी सोडणारे व्यवस्थीत काम करीत नाही नगरसेवकांना शोधावे लागते या सर्व बाबतीत दखल घ्यावी तरच शहराचा प्रश्न सूटेल.

श्री.दिलीप गायकवाड : मागिल बैठकीत पाण्याचा विषयावर चर्चा होत असतांना खाजगी विहीरी ताब्यात घेवून जास्तीत जासत पाणी मिळू शकते अशी मागणी केलीहोती या संदर्भात आतापर्यंत काय कार्यवाही केली.

श्री.पूनमचंद बम्हणे : हर्सूल भागात सूरूवातीस ५ मिनीटे पिण्याच्या पाण्यात जंतू येतात. या संदर्भात तक्रार दिली कार्यवाही होत नाही सभापती यांनी प्रत्यक्ष वार्डात भेट दिलेली आहे.

श्री.हिम्मतराव दाभाडे : वार्ड क्र ९० च्या संदर्भात बऱ्याच वेळा पाण्या विषयी समस्या मी मांडलेल्या आहेत एकनाथनगर, फूलेनगर हा भाग स्लम असून खड्डा तयार करून त्यातून पाणी जनतेला भरावे लागते जनतेला त्रास सहन करावा लागतो तरी वार्ड क्र.९०मधे एकनाथनगर फुलेनगर भागात व्यवस्थीत पाणी सोडण्याच्या दृष टीने कार्यवाही करावी.

सौ.संगिता जाधव : पूंडलीकनगर भागात आठ गल्ल्यामधे पाणी येत होते आता सधया एकही गल्लीत पाणी येत नाही मूख्यजलवाहीनी फुटल्यामूळे ही समस्या निर्माण झालेली असून नवीन पाईपलाईन टाकण्यात यावी.

श्री.अ.रशिद खॅान : पाणी कमी जास्त प्रमाणात येते बऱ्याच पाईपलाईन हया जून्या असून त्या बध्दलचे नकाशे महानगरपालिकेकडे नाहीत घासमंडी मधे अजीज नावाचे व्यक्ती आहे त्यांना पाण्याच्या पाईपलाईन बाबत पूर्ण माहिती आहे यापूर्वीही मी सूचना मांडली होती बऱ्याच भागात पाणी कमी आल्यास मोटार लावून पाणी घेतात इतरांना पाणी मिळत नाही मोटरने पाणी घेण्यास मनाई करावी तसेच काही भागात पाणी येते तर तेथे तोटया लावण्यात आलेल्या नाहीत पथक तयार करावे पोलीसची मदत घ्यावी अनधिकृत कनेक्शन बंद करावे २९ पोलीस कर्मचारी आहे त्यांचेकडून काहीही काम करून घेतले जात नाही ज्या दिवशी लाईट नसते त्यावेळी सर्वाना पाणी मिळते लाईट असते त्या दिवशी काही लोकांना पाणी मिळत नाही नवीन मूख्य जलवाहीनीवर काही काही कनेक्शन घेतलेले आहे ते बंद करावे जे ई जातात त्यांना सर्व माहिती असते परंतू लोक मारतील या भितीने अनधिकृत नळ बंद करीत नाही.

मा.महापौर : सार्वजनीक ठिकाणी जे नळ आहेत त्यास तोटया लावण्यात याव्यात तसेच अनधिकृत नळ शोधावे.

श्री.संजय जेजूरकर : संजयनगर भागात गोवडीपूरा येथे नवीन पाईप मंजूर झालेली होती आतापर्यत काम करण्यात आले नाही.

मा.महापौर : संबधीत अधिकारी यांनी खूलासा करावा.

कार्य.अभियंता (पापू) : नवीन पाईपलाईन जी आहे ती डीआयसीआय पाईप लाईनसाठी आहे त्या बाबत टेंडर काढल्यानंतर पाईपचा पूरवठा होत नसल्यामूळे सर्व कामे एकत्र करून मागिल आर्थिक वर्षामधे महानगरपालिकेने पाइप पर्चेस केले होते त्यानूसार ठेकेदारास देण्यात आले त्याच धरतीवर पून्हा संचिका सादर केलेली आहे पाईप महापालिका खरेदी करून ठेकेदाराना पूरवठा करणार आहोत.

श्री.भागवत कराड : अनेक भागात २-३ महीण्यापूर्वी नवीन पाईप लाईन टाकलेल्या आहेत वॅाल लावण्यात आले नाही पाणी सोडलेले नाही अनेक वेळा अधिकारी ठेकेदार यांना सूचना करून कार्यवाही होत नाही ४० वार्डात काम केले एक ते दीड कोटी रूपये बील ठेकेदारानी उचल केले यास जबाबदार कोण?

मा.महापौर : मागिल काही काळात नवीन पाईप लाईनचे जे काम झाले त्या बाबत मा.आयुक्त यांनी संचिका मागवून चौकशी करावी.

श्री.मधूकर सावंत :माझ्या वार्डात स्लम भागात पाईप लाईन टाकण्यात आली पाणी सोडल्यानंतर नेहमीच फुटते अधिकाऱ्यांना विनंती केली संबधीत ठेकेदार यांनी बिल घेतले असून आज त्या पाईपलाईनद्वारे पाणी मिळत नाही सदर एजन्सीला ब्लॅक लिस्ट करावे किंवा यापूढे काम देऊ नये..

श्री बन्सीलाल गांगवे : माजी महापौर सौ कोल्हे यांचे कार्यकाळात १९९५ ला मूकूंदवाडीभागात शिवाजी कॉलनी मधे पाण्याची पाईप लाईन टाकण्यात आलेली होती अदयाप ही त्या पाईप लाईनद्वारे पाणी सोडण्यात आलेले नाही.

कार्य.अभियंता(पापू) : या संदर्भात माहीती घवून ३ दिवसात लेखी कळविण्यात येईल.

सौ. मेहरून्नीसा बेगम : आतापर्यंत मी चार पाच पत्र दिले नेहरूनगर भागात ३० ते ३५ मिनिटे पाणी येते.एसटी कॉलनी मध्ये सध्या पाणी येत नाही अधिकारी वार्डात पाहणी करीत नाही.

श्री.मुजीब खॉन : माझ्या वार्डाला लागून ५० फुटावर स.सदस्या याचा वार्ड आहे माझ्या वार्डात जी समस्या आहे तीच परीस्थिती या वार्डात आहे कोणी अधिकारी येत नाही लाईनमन ४-५ दिवसाआड पाणी सोडतात.

श्री.मोहन मेघावाले : माझ्या वार्डात पाईप लाईनचे काम मंजूर झालेले असून अदयाप काम सूरू करण्यात आलेले नाही.

मा.महापौर : ज्या तक्रारी स.सदस्यांनी मांडल्या त्या संदर्भात येत्या २-३ दिवसाात लेखी खुलासा त्या त्या सदस्यांना कळविण्यात यावे.

श्रीखॉन निसार मो.खॉन :शरीफ कॉलनी भागात १५-२० मिनिटे पाणी येते पाणी सर्वांना मिळत नाही काही ठिकाणी ड्रेनेजचे पाणी पिण्याच्या पाण्यात जात आहे जनतेला खूप त्रास होतो पाण्याची समस्या दूर करावी.

श्री.विनायक पांडे : पहाडसींगपूरा भागातील पाण्याची टाकी गेल्या १५ दिवसापासून पूर्णत पाण्याने भरती आहे कोणात्या ही नागरीकाची पाण्या विषयी तक्रार माझ्या पर्यत आलेली नाही त्यामूळे प्रथमत मी पाणी पूरवठा विभागातील कर्मचा-यांचे अभिनंदन करतो रात्री २-३ वाजेपर्यत अधिकारी पाहणी करतात. बोगानाथनगर भागात अनेक विहीरी आहेत त्या विहीरीद्वारे वार्डात संपूर्ण ठिकाणी पाणी मिळू शकते त्यासाठी हातपंप बसविण्यात यावे भडकल गेट येथील टाकीवर जे पंप बसविण्यात आले तेथे ग्रॅव्हेटीने पाणी देण्यास ८-८ तास लागतात त्या ठिकाणी १२० चा पंप बसविल्यास ४ तासात टाकी भरेल.

श्री.दामोधर शिंदे : वार्ड क्र ७३ मध्ये छोटया व्यासाची लाईन बदलून नविन टाकलेली लाईन कार्यान्वित करावी याबाबत अधिकाऱ्यांना सूचना देण्यात यावे की नविन लाईनवर कनेक्शन करावे दोन पाईपमधे पाणी असल्याने प्रेशर कमी होतो जूनी लाईन बंद केल्याने प्रेशर वाढेल.

श्री.प्रशांत देसरडा : आठ कोटीचा लोंड शेडींग संदर्भात प्रस्ताव सादर केलेला होता व सदर काम केल्यानतर संपूर्ण शहराला वेळेवर व भरपूर पाणी मिळेल असा खुलासा अधिकारी यांनी केला होता. काही भागात पंपीगद्वारे पाणी मिळते तर काही भागात ग्रॅव्हेटीने पाणी पूरवठा होतो जेथे टाकीतून पाणी सोडण्यात येते अशा भागात १ दिवसा आड पाणी देण्यात येते तर ग्रॅव्हेटिने दररोज पाणी देण्यात येते ते कमी करून सर्वच भागात एक दिवसा आड पाणी देण्याचा प्रयत्न करावा जेणे करून शहरात संपूर्ण भागात पाणी मिळू शकेल.बऱ्याच भागात कामे झालेली आहे परंतू अर्धवट

असल्यामूळे काही एजन्सीला प्रत्येक दिवसाला रू. १५० आकारणी होते तरी त्या एजन्सी भिंत नाही केलेली दंडात्मक कार्यवाहीची अमलबजावणी होते का अशी शंका येते माझ्या वार्डात पाईप लाईनचे काम केले रस्त्यावर माती पडलेली होती मी स्वत: पैसे खर्च करून माती उचलली अशा किती एजन्सी आहेत कीत्यांचे तक्रारी आहेत त्यांचा प्रशासनाने अभयास करून कार्यवाही करावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: टाकी मधे पाणी येते किती मिनिटे व किती भागात वाटप होते याचा अभ्यास करणे गरजेचे आहे शहराला १२२ एमएलडी पाणी येते त्याचे वाटप कसे करता येईल यासाठी पाणी पूरवठा विभागात एक कमेटी आवशक आहे या विभागावर कुणाचे नियत्रंन आहे. आजची परीस्थिती अशी आहे की लाईनमन एका भागात वॉल कमी केला तर दूसऱ्या भागात जास्त पाणी येते नगरसेवक जावून बोलतात पून्हा त्या भागात जास्त पाणी येते नियत्रंन ठेवण्यासाठी एक कमेटी आवश्यक आहे कुण्यातरी अधिकाऱ्याकडे जबाबदारी फीक्स करावी.जे पाणी वाटप होते ते टाकीतून किती वाजता सोडले किती वेळ सोड्णयात येते याचा हिशोब असणे आवशक आहे यासाठी वार्डवाईज एक समिती असावी त्यात प्रशासनाचे पदाधिकारी असावे पाण्यासाठी नागरीक ओरळत आहे वार्डात पाणी दिले नाही तर त्या भागात अधिकारी यांनी व्हीजीट दिली पाहिजे पदाधिकारी यांनी व्हिजीट दिली पाहिजे मा.आयुक्त यांनी व्हिजीट दिली पाहि मा.भोगे साहेब शहरात व्हीजीट देत होते.

मा.महापौर : लाईनमनच्या बाबतीत ज्या ज्या तक्रारी केल्या त्या संदर्भात प्रशासनाने दखल घ्यावी.

श्री.कचरू मोरे : कबीरनगरभागात ४ वसाहती असून ५० टक्के भागात पाणी येते तर ५० टक्के भागात पाणीच येत नाही अधिकारी येवून भेट घेवून गेले पाण्याचा दाब वाढवावा किंवा पाण्याची वेळ वाढवा परंतू दखल घेतली नाही तरी संपूर्ण वसाहतीत पाणी मिळावे अशी विनंती आहे.

सौ.मोमीन सफीया बेगम : वार्ड क्र ९६ मध्ये सिल्कमील कॉलनी भागात २-३ दिवसाआड पाणी येते ते सूध्दा कमी दाबाने येते.

श्री.प्रल्हाद निमगांवकर : माझ्या वार्डात काही गृहनिर्माण संस्था आहेत त्यांनी १०० टक्के विकास कर भरणा केलेला असतांना पाणी पूरवठा लाईन टाकलेली नाही मागिल अर्थसंकल्पात १० लक्ष मंजूर केले होते टेंडर काढले आचारसंहिता सूरू झाली काम करण्यात आले नाही काम का करण्यात आले नाही.

श्री.शंशाक विसपूते : मागिल बजेटमधे १० लक्षचे काम मंजूर केले टेंडर निघाले का करण्यात आले नाही खुलासा घ्यावा.

श्री. संजय जगताप : माझ्या वार्डात २५-३० लक्ष रू खर्च करून उदयान बांधलेले आहे तेथे एक कर्मचारी काम करीत नाही त्या उदयानात अवैध धंदे चालतात मा.आयुक्त यांनी प्रत्यक्ष पाहणी करून त्या उदयानाची दूरूस्ती करावी.

मा.महापौर : पाणी प्रश्नावर भरपूर चर्चा झालेली आहे जवळपास सर्वच भागात समस्या आहे प्रशासनाने या बाबतीत दखल घ्यावी व पूढील उन्हाळ्यापर्यत पाणी पूरवठा कमी होणार नाही यासाठी ठोस काही योजना तयार करावी अशी मा.आयूक्त यांना सूचना करण्यात येत आहे. मा.आयूक्त यांचे काही सूचना असतील तर त्या त्यांनी सभागृहासमोर मांडाव्या .

मा.आयूक्त : सध्या जायकवाडी जलाशयातून १३३ एमएलडी पाणी येते तसेच हसूल तलावातून ७-८ एमएलडी पाणी येते हर्सूल येथून १२ एमएलडी साठी डीझाईन

केलेली आहे. तेथून ७ ते ८ एमएलडीच पाणी मिळू शकते.पूढील एक महिण्यात जायकवाडी धरणातून १०-१२ एमएलडी पाणी वाढवू शकतो त्यासाठी ७ ते ८ तास शहराचा पाणी पूरवठा बंद करावा लागेल.तेथे नवीन पंप बसविण्यासाठी व इतर कामासाठी सात ते आठ तासाचा अवधी लागेल. यापलीकडे आणखी पाणी पूरवठा करू शकणार नाही त्यासाठी नवीन स्कीम करावी लागणार आहे.ती योजना आपण अमलात आणत आहोत. त्यामूळे ६५ एमएलडी पाणी वाढवू शकते परंतु इतके पाणी वाढवू शकते का याबध्दल भ्रम निर्माण होतो. त्या बध्दल खरोखरच ६५ एमएलडी पाणी येईल का या बाबत संबधीत विभागास तसे कळविण्यात आलेले आहे की टेक्नीकल बाब तपासून खूलासा दयावा.ही योजना न राबविता इतर काही उपाययोजना करून फक्त १५ ते २० एमएलडी पेक्षा जास्त पाणी वाढविता येणार नाही.या शहरासाठी पाणी पूरवठा व्हावा यासाठी गरज लक्षात घेता स्कीम अमलात आणावीच लागेल.त्या योजनेसाठी सर्वात चांगला व स्वस्त पीएमसी नेमणूक करायची ते स्टडीज करून देतील व कमीत कमी १०० ते१५० एमएलडी पाण्यासाठी ती स्कीम करावी लागणार आहे.कारण जायकवाडी धरणामधे पूरेसे पाणी उपलब्ध आहे, पाणी उपलब्धतेची अडचन नाही फक्त पाणी तेथून शहरापर्यंत आणण्यासाठी खर्च लागणार आहे.नवीन पाईपलाईनही कमीत कमी १२०० ते १३०० एमएम ची करावी लागेल.त्यासाठी जवळपास ६० ते७० कोटी रूपये खर्च अपेक्षीत आहे.महानगरपालिकेची आर्थिक परीस्थिती चांगली नसेल तरी हा खर्च सोसावा लागेल.याशिवाय पर्याय नाही.पीएमसी नेमण्याची कार्यवाही सूरू झालेली आहे. पूढील एक ते दीड महिण्यात पीएमसी नियूक्त करून होईल ते अहवाल देतील.त्यानंतर तसे विषय मंजूरीसाठी सभागृहासमोर येतीलच. आताच जवळपास सर्वच सदस्यांनी ज्या ज्या तक्रारी केल्या त्या संदर्भात संबधीत अधिकारी एकत्रित माहिती घेउन तसा खुलासा करतील. लाईनमन बाबतीत ज्या सूचना केल्या त्या बाबतीत दखल घेतली जाईल लाइनमनच्या चुकीमूळे होऊ शकते काही भागात कमी तर काही भागात जास्त पाणी दिल्या गेला असेल.ज्या ज्या तक्रारी स.सदस्यानी दिलेल्या आहेत त्याचे उत्तर संबधित अधिकारी एकत्र करून माहिती देतील तसेच जी मोठी स्किम राबवावयाची आहे त्या बाबतीत पीएमसी अहवाल देतील त्यानंतर तीन ते चार महिण्यात या संदर्भातील प्रस्ताव आपल्या समोर येईलच .माझ्या माहिती प्रमाणे अधिकारी कर्मचारी हे रात्री दोन वाजेपर्यत काम करतात. अतिशय मेहनत घेतात.आणखी पाणी पूरवठा सूरळीत करण्यासाठी प्रशासन प्रयत्न करेल.

श्री.संजय सिरसाट :स.सदस्य श्री निमंगावकर यांनी जो प्रश्न उपस्थित केला तो अत्यं गंभीर आहे.गेल्या १५ वर्षापासून पाणी दिले नाही त्या भागातील लोकानी बेटरमेंन्ट चार्जेस भरलेले आहे तसेच शहर विकास कर भरलेले असतांना सूधदा तेथे पाण्याची पाईपलाईन टाकण्यात आलेली नाही.देशमूखनगर,रामकृष्णनगर भागात व इतर ठिकाणीच्या रहिवाश्यांना पाणी का देत नाही.१५ वर्षापासून येथील नागरीक वंचीत का आहेत यांचा खुलासा घ्यावा.

श्री.मूजीब खान : आताच मा.आयुक्त यांनी खूलासा केला हर्सूल धरणातून जास्तीचे पाणी घेता येणार नाही परंतू या धरणाचे क्षेत्र मोठे आहे धरणामधे गाळ मोठया प्रमाणात झालेला असून धरणाच्या बाजूला मोठमोठे अतिक्रमण झालेले असून त्यामूळे व्याप कमी झालेला आहे. त्यासाठी धरणातील गाळ काढून तसेच बाजूचे अतीक्रमण काढल्यास पाणीसाठा मोठया प्रमाणात होवून पाणी साठवण क्षमता वाढेल.

उपमहापौर : बऱ्याच वेळ पासून पाणी प्रश्नावर चर्चा चालू आसून काही सदस्यांनी पाणी मूबलक येते म्हणून अभिनंदन केले तर काहींनी यातना व्यक्त केल्या.मा.आयूक्त यांनी सूध्दा प्रशासन चांगले काम करीत आहे असे नमूद केले.या सभागृहात लाईनमन नाही, लहान पाईप लाईन फूटलेली आहे, या सभागृहात पॉलीसी मॅटरवर चर्चा होणे अपेक्षीत आहे परंतु लहान लहान गोष्टीवर अनेक वेळ चर्चा होते यावरून प्रशासन किती सक्षम आहे हे दिसून येते. कारण हे सभागृह पॉलीसी डिसीजन घेण्यास सक्षम आहे परंतु तशी चर्चा न होता इतर लहान बाबींवर चर्चा होते. १० वर्षापासून पाईपलाईन टाकली जाते परंतु पाणी सोडण्यात येत नाही तसेच काही ठिकाणी पाईप लाईन फूटते अशा लहान लहान सूचना सभागृहात चर्चेला येऊ नये या संबधी मा.आयूक्त तसेच मा.महापौर यांनी तशा सूचना संबधीत अधिका-यांना दिल्या पाहिजे.हा विषय लहान जरी असला तरी नगरसेवकांना मोठा त्रास होतो नागरीक त्यांचे घरी येतात प्रथम प्राधान्य त्यांना दयावे लागते.नगरसेवकांनाकोणतेही बंधन नाही केंव्हाही येऊन नागरीक दाटतात.जर नगरसेवकांना लाईनमनकडे जावे लागत असेल पाणयाच्या टाकीवर जावे लागत असेल तर ही बाब भुषणास्पद नाही. असे लहान विषय यापूढे सभागृहात येउ नये तशा सुचना मा.महापौरांनी संबधीत अधिका-याना दयाव्यात . प्रशासन काम करीत असतांना प्रशासन व लोकप्रतिनिधी ही रथाची दोन चाके आहेत तरच काम पूर्ण होउ शकेल. चांगले काम केले तर अभिनंदन होउ शकते व वाईट काम केले तर त्यास सभागृह शिक्षा करू शकते हे दाखवून दिलेले आहे.अशी चर्चाहोत असतांना ठोस निर्णय झाला पाहिजे. सभागृहनेते यांनी निदर्शनास आणून दिले की गेल्या १५ वर्षापासून लिगल वसाहतीमधे पाणी मिळत नाही त्या नागरीकांनी बेटरमेंन्ट चार्जेस भरणा केले शहर विकास कर भरणा केला एवढे करूनही पाणी मिळत नसेल तर लोकांची भावना ही चोरी करण्यापर्यंत जाते. अनधिकृत कामाकडे कल होते.

कार्यकारी अभि.(पापू) : देशमूखनगर सर्वे नंबर ५३ येथे एमजेपी तर्फे टाकी बांधण्याचे काम चालू आहे ३० ते ३५ टक्के काम पूर्ण झालेले आहे, टाकीचे पूर्ण काम झाल्यानंतर या भागात पाणी पूरवठा करण्याचा विचार आहे. क्रातीचौक येथून पंपींगद्वारे २४ तास पाणीपूरवठा करीत आहोत.

श्री.कोकाटे काशिनाथ : दोन तासापासून पाणी प्रश्नावर चर्चा चालूआहे. जेष्ठ सदस्यांनी पाणीपूरवठयात सूधारणा होण्याच्या दृष्टीने मत व्यक्त केले.जे पर्याय सूचविलेले आहे त्याची दखल प्रशासनाने घ्यावी.आताच खूलासा केला की टाकीचे काम झाल्यानंतर देशमूखनगर भागात पाणी देण्यात येईल. चार दिवसापूर्वीच मी पूंडलिकनगर,आरबीहील गारखेडा परीसर तसेच देखमूखनगर भागात पाहणी केली.माझ्याबरोबर काही स.सदस्यही होते. नागरीकांपासून पाण्याच्या बाबतीत होणारा त्रास त्यातून आपआपल्या भावना स.सदस्यांनी व्यक्त केलेल्या आहेत. जी उत्तरे दिली जातात ती बरोबर नाही.जर लिगल वसाहत असतांना तेथे १५ ते २० वर्ष पाणी पूरवठा होत नाही. देशमूखनगर भागात टाकीचे बांधकाम चालू आहे त्या टाकीचा व त्या भागाचा कुठल्याही प्रकारचा संबध येत नाही.तेथील उर्वरीत वसाहतीला पाणी पूरवठा होतो फक्त देशमूखनगर भागातच पाणी पूरवठा होत नाही, का? ज्या वेळेस लेआउट मंजूर करतो त्यावेळेस किती दिवसात पाणी देणार आहोत हे सूध्दा सांगण्याची आवश्यकता आहे.प्रत्यक्ष शहरात पाहणी केली तर जवळपास २० ते २५ टक्के वसाहतींना पाणी देऊ शकत नाही अशी परीस्थिती

निर्माण झालेली आहे. एकीकडे ही परीस्थिती असतांना परवाच्या अर्थसंकल्पास ज्या पर्यायी व्यवस्थेबाबत ज्या पध्दतीने सूचवायचे होते ते सूचविले नाहीत. पाण्याच्या लाईन टाकण्याच्या संदर्भात एकत्रीत टेंडर काढून कार्यवाही करणार आहोत असे म्हटले परंतू बजेटमधे काम करणयासाठी २ लक्ष, ३ लक्ष अशी रक्कम कशासाठी ठेवणयात आलेली आहे पून्हा ती चूक का केलेली आहे.या सभागृहाची दिशाभूल करून एक पाईपलाईनचे काम दोन तीन वर्ष पूर्ण होत नसेल तर ही दूर्देवी बाब आहे.दोन वर्षापूर्वी सीआय पाईप खरेदीचे टेंडर काढले होते जे पाईप लाईन खराब आहे तेथे ते काम करण्यात येणार होते परंतू आजपर्यंत काम पूर्ण झालेले नाही. अशी चूकीची कामे थांबली पाहिजे. नवीन पाण्याची योजना करायची असल्यास त्यासाठी बजेटमधे तरतूद करावी लागणार आहे. देशमूखनगर प्रमाणेच रामकृष्ण हौसींग सोसायटीला पाणी दिल्या जात नाही. लिगल वसाहतीत पाणी देण्यात येत नसेल तर प्रशासन काय काम करते खुलासा करण्यात यावा.

मा.आयूक्त :आताच दोन तीन लिगल वसाहतीचा उल्लेख केलेला आहे पाणी मिळत नाही याबाबतीत पूढील ७ ते ८ दिवसात तांत्रिक बाबी तपासून शक्य असेल तर कार्यवाही होईल नसता दूसरा पर्याय काढून कार्यवाही करता येईल.दूसरा कॉमन टेंडरबाबत विषय निघालेला आहे.आपण एक एक टेंडर काढत आहोत पाईपची किंमत जास्त आहे प्रत्येक टेंडर हे ३० ते ४० टक्केनी जास्त येतात.मागील वर्षी पाईप हे महानगरपालिकने खरेदी केलेले होते.आणि फक्त लेबर कामांचा ठेका ठेकेदाराना दिला होता.त्यामूळे १५ ते २० टक्केच खर्च महानगरपालिकेला आलेला होता.त्या पध्दतीनेच करण्याचा आमचा मानस आहे. या वर्षीचा अर्थसंकल्प स्थायीसमिती समोर येणारच आहे मंजूरी सभागृहच देणार आहे.

श्री.संजय सिरसाट : मा.आयूक्त यांनी त्यांचे पध्दतीने खूलासा केला. गेल्या १५ वर्षापासून देशमूखनगर व इतर भागात पाणी नाही. अधिकारी सांगतात त्या भागात पाणी दिले तर शिवाजीनगरभागात पाणी कमी पडेल.जेथे सेल्फडेव्हलपमेंन्ट वसाहत असते तेथे ताबडतोब कनेक्शन दिल्या जाते.आणि जे नागरीक पैसे भरण्यास तयार आहे त्यांचेशी प्रशासन १९९२ पासून पत्रव्यवहार करतात त्यांना पाणी दिल्या जात नाही.विनंती की कोणत्याही नागरीकांना त्यांचे हक्कापासून वंचीत ठेवू नये.सदर वसाहत ही अनधिकृत नाही किंवा गुंठेवारीत येत नाही लिगल आहे. येणा-या बजेटमधे त्यासाठी स्पेशल तरतूद ठेवून तेथील काम तात्काळ हाती घ्यावे.संबधीत नगरसेवकांबरोबर व्हिजीट करावी. याबाबतीत अभयास करून ४ महिण्यात त्या भागात पाणी पूरवठयाची व्यवस्था करावी.

श्री.रेणूकादास वैद्य : टेस्टींग घेतांनाच काही नवीन पाण्याच्या पाईपलाईन फुटलेल्या आहेत. कॉलीटी एकदम वीक असून याकडे सुध्दा लक्ष देणे गरजेचे आहे.आताच मा.आयुक्तांनी खुलासा केला की पाईपची किमंत वाढलेली आहे.प्रत्येक वेळेस ४०टक्के जास्त दर भरून येत आहे नवीन डी.एस.आर नूसार घ्यावे.बदल करावे.

श्री.संजय जोशी : पाईपची प्रत चांगली असावी याकडे मा.आयूक्तांनी लक्ष ठेवावे. चाचणीच्याचवेळी फुटते.

सौ.लता दलाल : फारोळा येथील फिल्ट्रेशन प्लांटची आजची परीस्थिती काय आहेत पाहणी केल्यास असे दिसून येईल.की,तेथील जून्या मशीनरी अत्यंत खराब झालेल्या आहेत जेथे पाणी स्वच्छ केले जाते तेथे पोते टाकलेले दिसेल. टेंडर काढून तेथील मशीनरी खरेदी करण्याचे काम एका एजन्सीजला दिले होते परंतू आजही तेथे जून्याच मशीन आहेत शहरातील अनेक ठिकाणी जूने वॉल बसविल्या जातात.

कॉटला कॉलनी, समर्थनगर औरंगपूरा नागेश्वरवाडी या भागात ज्या जलवाहिणीतून पाणी पूरवठा होतो त्या पाईपलाईन वरील वॉल जूने झालेले आहे असे उत्तर सातत्याने ऐकावयास मिळते.ज्या एजन्सीने ते वॉल बसविले आहे पाईपलाईन दुरूस्त केल्या आहेत त्या एजन्सीवर दंडात्मक कार्यवाही व्हावी.व जेथे जेथे जूने वॉल तसेच पाईपलाईन आहेत तेथे नवीन पाईपलाईन बसविण्यासाठी दूस-या एजन्सीला काम दयावे जेणे करून पाणी पूरवठा नागरीकांसाठी सूरळीत होईल.

श्री.संजय केनेकर : गेल्या ७-८ दिवसात वृत्तपत्रात महानगरपालिकेच्या संदर्भात वेगवेगळ्या बातम्या छापून येत आहेत, सदर बातम्या महानगरपालिकेच्या विश्वासाहर्ता गमवण्याच्या व कमी करण्याच्या आहेत. दिनांक ०६.०६.२००५ रोजी जी अनु.जाती-जमातीच्या चतूर्थश्रेणी पदाच्या संदर्भात लेखी परीक्षा घेण्यात आली, असंख्य अर्ज आले होते. उमेदवारांना मुलाखत पत्र देण्यात आले. दररोज वृत्तपत्रात येत आहे, याकडे प्रशासन सुध्दा लक्ष देत नाही. ज्या लेखी परीक्षा झाल्या त्या संदर्भातील उत्तर पत्रिका महानगरपालिकेनेच तपासणी केल्या प्रश्न पत्रिका सुध्दा महानगरपालिकेने तयार केल्या, अधिकारी यांनी हव्या त्या लोकांनाच मुलाखत पत्र दिलेले आहे. त्यांनाच त्या परीक्षेस बोलाविण्यात आले. एका उमेदवाराने मा.आयुक्त तसेच पदाधिकारी यांना निवेदन दिलेले आहे. त्या युवकांना मुलाखतीसाठी बोलविण्यात आले नाही मुलाखत पत्र देण्यात आले नाही. आणि दुसऱ्या एका युवकाने वृत्तपत्रात दिले की, महानगरपालिका ही वशिलाचा किल्ला आहे. ही बाब महानगरपालिकेच्या दृष्टीने बरोबर नाही. मुलाखत पत्र देण्यामध्ये जो दुजाभाव झालेला आहे, तो का केलेला आहे. तसेच सेवायोजन कार्यालयाकडून जी यादी मागविण्यात येते ती फक्त सहा महिन्यासाठी चालते सहा महिन्यापेक्षा जास्त दिवस झाल्यास ती यादी ग्राह्य धरण्यात येत नाही. सन २००३ च्या यादीनुसार काही उमेदवारांना कॉल लेटर देण्यात आलेले आहे. ते कितपत योग्य आहे, याचा खुलासा प्रशासनाने करावा.

मा.महापौर : प्रशासनाने खुलासा करावा.

उपआयुक्त (प्र.) : महानगरपालिकेमध्ये दिनांक ०६.०६.२००५ रोजी लाईनमन विद्युत,लाईनमन पाणी पुरवठा,ईलेक्ट्रीक पंप चालक, सुरक्षा रक्षक, माळी, शिपाई ई.१९ पदासाठी लेखी परीक्षा घेण्यात आलेली होती. परीक्षे संदर्भात २९.०६.२००५ रोजीच्या स्थायी समितीच्या बैठकीत सविस्तर अशी चर्चा झालेली आहे. स्थायी समितीच्या काही सदस्यांनी या भरती संदर्भात प्रशासनाचे अभिनंदन सुध्दा केलेले होते. स.सदस्य श्री.केनेकर यांनी जो प्रश्न उपस्थित केला, हव्या त्या उमेदवारांना मुलाखत पत्र देण्यात आले. काही उमेदवारांना डावलण्यात आले. या विषयी मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, या परीक्षेत उपस्थित राहू इच्छिणाऱ्या १०१४ उमेदवारांना मुलाखत पत्र पोष्टामार्फत दि.१७.०५.२००५ रोजी देण्यात आलेले होते. त्याचा पुरावा प्रशासनाकडे उपलब्ध आहे. या परीक्षेसाठी अकोला, वाशिम,लातुर,नांदेड अशा मराठवाडाच नव्हे तर मराठवाड्या बाहेरीलही उमेदवार उपस्थित होते. एखाद्या उमेदवाराला मुलाखत पत्र प्राप्त झाले नव्हते तर त्यांनी प्रशासनाकडे परीक्षेपूर्वी आणि परीक्षा स्थळावर जे उमेदवार आले अशा काही उमेदवारांना त्या ठिकाणीच मुलाखत पत्र उपलब्ध करून परीक्षेला बसण्याची परवानगी दिली होती. हा मुलाखत पत्र न मिळालेल्या उमेदवारा विषयीचा खुलासा आहे. दुसरा मुद्दा असा की, या परीक्षेसाठी पेपर सेट करणे व तपासणे या विषयी

खुलासा असा की, या विविध सहा पदासाठी वेगवेगळ्या सहा प्रश्न पत्रिका तयार करण्यात आलेल्या होत्या या प्रश्नपत्रिका आपण मा.पोलीस आयुक्त कार्यालय, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शासकीय तंत्रनिकेतन,कोषागार कार्यालय, विक्रीकर विभाग अशा अधिकाऱ्याकडून प्रश्नपत्रिका मागविण्यात आलेल्या होत्या त्यातून काही प्रश्न निवडून दि.०५.०६.२००५ रोजी उपआयुक्त (प्र.) यांचे दालनात सकाळी ९ वाजेपासून ते रात्री ९ वाजेपर्यंत यामध्ये पारदर्शकता व गोपणीयता राखण्याच्या दृष्टीने जे संगणक वापरण्यात आले होते, ते संगणक सुध्दा उपआयुक्त (प्र.) यांचे समोर होते. त्यातील डाटा कोणीही बाहेर घेऊन जाऊ शकणार नाही याची खबरदारी सुध्दा प्रशासनाने घेतलेली आहे. या परिक्षेचे उत्तर पत्रिका दि.१३.०६.२००५ रोजी मा.आयुक्त यांचे निर्देशानुसार उपआयुक्त (प्र.) यांचे मार्गदर्शनाखाली ''सरदार बी.करमसिंग ओबेरॉय सभागृहात '' तपासणीची कामे पार पाडण्यात आली. यासाठी एकूण १५ अधिकारी/कर्मचारी नियुक्त करण्यात आले होते. त्यांना सविस्तर सूचना देण्यात आलेल्या होत्या. त्यांना लाल शाईचा पेन सुध्दा देण्यात आलेला होता तो यासाठी देण्यात आला होता की, उमेदवाराच्या पेपरवर एखाद्या परीक्षकाची इच्छा झाल्यावर स्वत: उत्तर लिहून स्वत: तपासणी करायची सोय सुध्दा आम्ही यामध्ये ठेवलेली नव्हती. या परीक्षेचे पेपर ज्यांनी तपासले होते, त्यातील काही परीक्षक सभागृहात उपस्थित आहे. या संदर्भात काही वृत्तपत्रात वाईट बातम्या आल्या असतील परंतु बऱ्याच पेपरमध्ये चांगल्या सुध्दा बातम्या आलेल्या आहेत. या बाबतीत प्रशासनाने सर्वतोपरी खबरदारी घेतलेली आहे. हे पुन्हा मा.महापौर यांचे परवानगीने सभागृहास सांगू इच्छितो की, ही परीक्षा प्रक्रीया चांगल्या पध्दतीने पारदर्शकपणे तसेच गोपनियतेने पार पाडण्यात आलेली आहे.

श्री.संजय केनेकर : सेवायोजन कार्यालयाकडून मागविलेली यादी किती दिवसापूर्वीची होती.

उपआयुक्त (प्र.) : सदर भरती संदर्भात दि.१३.०६.२००३ रोजी प्रशासनामार्फत जाहीरात देण्यात आलेली होती. जेंव्हा एखाद्या पदासाठी जाहीरात दिली जाते तेंव्हा त्या पदासाठी विहीत अर्हता निश्चित केली जाते. त्यामध्ये त्या तारखेला त्या व्यक्तीचे वय किती असावे. त्या व्यक्तीचे त्या तारखेला शिक्षण किती असावे. दिनांक १३.०६.२००३ च्या जाहीरातीमध्ये ज्या अर्हता निश्चित करण्यात आल्या होत्या त्याअनुषंगाने ती यादी सेवायोजन कार्यालयाकडून मागविण्यात आलेली होती या भरती संदर्भात काही उमेदवार न्यायालयात गेल्यामूळे ही भरती प्रक्रीया स्थगित झालेली होती. या संदर्भात स्थगिती उठल्यानंतर ही भरती प्रक्रीया प्रशासनाने पार पाडलेली आहे. परीक्षा पध्दती ही भारतीय घटनेच्या कलम ३१५ आणि ३२४ अन्वये केंद्रीय लोकसेवा आयोग व राज्य लोकसेवा आयोग ज्या पध्दतीने परीक्षा घेतात त्या पध्दतीने घेतल्या जातात. राज्य लोकसेवा आयोगाची उपनिरीक्षक पदासाठी परीक्षा १९९९ साली जाहीर झाली होती. ती भरती प्रक्रीया २००५ साली पार पडली त्यासाठीची अर्हता ही १९९९ ची धरण्यात आली होती.

श्री.संजय केनेकर : काही अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस दिल्या आहेत का आणि त्या का देण्यात आल्या याचाही खुलासा करण्यात यावा.

उपआयुक्त (प्र.) : यामध्ये तीन अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेल्या आहेत. या नोटीसा देण्यामागे त्यांनी त्यांचे कर्तव्यात कसूर करणे दोन उमेदवारांनी परीक्षा ही दुसऱ्याच परीक्षार्थींच्या जागेवर दिलेली होती त्यांचे कारण असे होते की, ते

परीक्षार्थी अनुपस्थित होते. यामध्ये दिरंगाईपणा किंवा हलगर्जीपणा ज्या अधिकाऱ्यांनी केला, त्यामूळे त्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली.

श्री.संजय केनेकर : ज्या उमेदवारांना मुलाखत पत्र दिले गेले नाही जे आले त्यांना बसविण्यात आले, किंवा बसविण्यात येईल असा खुलासा वृत्तपत्रातून केलेला होता का?

उपआयुक्त (प्र.) : अशा प्रकारची घोषणा प्रसिध्द केले होते की, ही परीक्षा दि.०६.०६.२००५ रोजीच घेण्यात येईल. आणि सर्व उमदेवारांना मुलाखत पत्र पाठविण्यात आलेले आहे, असा खुलासा केलेला आहे.

श्री.संजय केनेकर : खुलासा केला, परंतू ओळखीच्यांना परीक्षेच्यावेळी बसविण्यात आले असे बऱ्याच युवकांनी सांगितलेले आहे, तसे त्यांनी लिहून सुध्दा दिलेले आहेत. ते निवेदन मा.आयुक्तांकडे दाखल केलेले आहे. मुलाखत पत्र मिळाले नाही त्यांना बसू दिल्या जाईल असा वृत्तपत्रात जाहीर खुलासा का करण्यांत आलेला नाही.

उपआयुक्त (प्र.) : यामध्ये जे उमेदवार महापालिका सेवेत येऊ इच्छितात त्यांची एवढी जबाबदारी किमान आहे की, मुलाखत पत्र मिळाले नाही, ते प्रशासनाकडून प्राप्त करून घ्यावे.

श्री.संजय केनेकर : हजारो युवकांना कॉल लेटर देऊन व बाकीच्या युवकांना हे प्रशासन गाफिल ठेवून प्रशासन सुध्दा सभागृहाची दिशाभूल करीत आहे. दोन दिवसापूर्वी उपमहापौर यांची बातमी वृत्तपत्रात आलेली आहे. काही तरूणाच्या आयुष्याचा हा खेळ प्रशासन खेळत आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : हा व्यक्तीगत विषय मांडलेला आहे. दुसऱ्या विषयावर चर्चा करावी.

श्री.भगवान घडमोडे : हा विषय व्यक्तीगत होत नाही स.सदस्य श्री.केनेकर यांना नोकरी हवी नाही. एका बेकार तरूणाच्या बाबतीत ते बोलत आहे. हे लक्षात घ्यावे. जनरल चर्चेमध्ये हा विषय आहे. व्यक्तीगत विषय नाही.

(याचवेळी मा.महापौर यांचे डायस समोर स.सदस्य एकत्र जमा होतात मोठमोठ्याने बोलतात काहीही एकू येत नाही.)

श्री.भगवान घडमोडे : एका तरूणाचे आयुष्याशी प्रशासन खेळत आहे. त्याची मानसिक स्थिती ढासळलेली आहे. त्यांनी सर्वांना तसे निवेदन दिलेले आहे. जे यास विरोध करीत आहेत, त्यांना गरीबांच्या मुलांची जाणीव नाही. कारण ते श्रीमंत असतील. स.सदस्य श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय हे श्रीमंत असल्यामूळे त्यांना गरीबांच्या मुलाची जाणीव नाही. म्हणून विरोध करीत आहात.

मा.महापौर : सर्व सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे. अर्ध्या तासासाठी सभा तहकुब करण्यात येते. (सभा तहकूब सायंकाळी ७.०० वा. सभेला सुरूवात ७.४० वाजता.)

मा.महापौर : नोकर भरती संदर्भात जी चर्चा झाली त्या बाबतीत मा.आयुक्त यांनी चौकशी करावी, योग्य तो निर्णय मा.आयुक्तांनी घ्यावा.

श्री.बन्सीलाल गागंवे : पहाडसींगपूरा भागात महापालिकेच्या जागेवर अतिक्रमण केलेले आहे. त्यात विरोधीपक्ष नेता यांचे नाव दिलेले आहे वृत्तपत्रात तसे आलेले आहे. यात महानगरपालिकेची बदनामी होत आहे या बाबतीत खूलासा करण्यात यावा.

श्री.संजय केनेकर : स.सदस्य यांनी जो मूद्दा उपस्थित केला त्या बातमीचा खूलासा करण्यात यावा महानगरपालिकेच्या संबधीत आहे.

श्री.अब्दूल रशीद खॉन :मा.आयूक्ताकडे तक्रार करावी.नियमानूसार कार्यवाही प्रशासन करेल.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: वृत्तपत्रातील प्रत्येक बातमीवर चर्चा करणे योग्य नाही.

मा.महापौर : या संबधी स.सदस्यांना लेखी खुलासा प्रशासनाने दयावा आता विषय क्र १ वर चर्चा करावी.

**विषय क्र. ३२/१ :**

दिनांक ०९.०६.२००५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

श्री.देसरडा प्रशांत : मागील बैठकीचे इतिवृत्त स.सदस्यांना देण्यात आलेले नाही.

श्री.संजय जोशी : नगर सचिव विभागात कर्मचारी कमी आहेत का? खूलासा घ्यावा इतिवृत्त का देण्यात आलेले नाही.

मा.महापौर : पूढील बैठकीत दिं १७.६.२००५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त देण्यात येईल.

श्रीमती अलका पाटील : सभेची वेळ बदलण्यात यावी.

मा.महापौर : विषय क्र.१ मंजूर.

**ठराव :**

दिनांक ०९.०६.२००५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणेस मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र. ३३/२ :**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महाराष्ट्र शासनाने उद्योग, उर्जा व कामगार विभागातर्फे शासन निर्णय बी.एल.ए.१००४/प्र.क्र./६११/उर्जा-४ मंत्रालय,मुंबई-३२ दिनांक १२.०७.२००४ अन्वये सार्वजनिक पिण्याच्या पाणी पुरवठा योजना यांना विज बिलाच्या थकबाकी द्यावयाच्या सवलती संदर्भात '' सार्वजनिक नळ पाणी पुरवठा संजिवनी योजना '' जाहीर केलेली आहे. या योजने मागील शासनाचा उद्देश उपरोक्त संस्थाकडे सार्वजनिक नळ पाणी पुरवठा योजनेवरील विज बिलाच्या थकबाकीचा आर्थिक बोजा कमी करणे आहे.

**या योजनेची वैशिष्ट्य खालीलप्रमाणे आहे.**

अ. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परीषद व नगरपालिका यांच्या ३० जून २००४ पर्यंतच्या थकबाकी पैकी ५०% रक्कम जुलै २००४ पासून दहा समान मासिक हप्त्यात भरणा करणे तसेच चालू विद्युत देयकाची रक्कम नियमीतपणे भरल्यासच त्यांना सदर योजना अंतर्गत देण्यात येणाऱ्या सवलतीचा लाभ मिळेल.

ब. १. ग्राहकाने थकबाकीचा हप्ता व चालू विद्युत देयक, देयकात दर्शविलेल्या अंतिम दिनांकी भरणे आवश्यक आहे.

२. ग्राहकाने वरील प्रमाणे मुळ थकबाकीचा ५०% रक्कम हप्त्या हप्त्याने भरल्यानंतर थकबाकीचा उर्वरीत रक्कम माफ करण्यात येईल.

३. उर्वरीत ५०% रक्कम व थकबाकीच्या वरील व्याजापैकी ५०% रक्कम शासनातर्फे विद्युत मंडळास कर्जाच्या समायोजनाद्वारे अदा करण्यांत येईल.

४. विद्युत मंडळाकडून उर्वरित ५०% व्याजाची रक्कम व संपूर्ण विलंबाकार माफ करण्यांत येईल.

ही योजना सध्या ग्रामपंचायत, पंचायत समिती,जिल्हा परीषद व नगरपालिका यांचे पुरतीच मर्यादित आहे. तथापी सदरील योजने अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेस सवलत मिळणे बाबत शासनाकडे मागणी करण्याकरीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर करण्यात येत आहे.

माहे २००५ अखेर विद्युत देयकाची थकबाकी रूपये २०३,४१,०४,७८०/- आहे. या योजनेनुसार एकूण २०३.४१ कोटी थकबाकी पैकी निव्वळ देय रक्कम रूपये ९७,८६,०२,९९०/- इतकी आहे. उर्वरीत रक्कम रूपये १०५,५५,०१,७९०/- ही डी.पी.सी.व्याज इत्यादी आहे.

सदर योजनेनुसार निव्वळ थकबाकीच्या ५०% म्हणजेच ४८,९३,०१,४९०/- चा भरणा दहा समान हप्त्यात नियमित विद्युत बिला सोबत केल्यास उर्वरीत रूपये १५४.४८ कोटी पैकी रक्कम रूपये १०१.२५ कोटी शासनाने महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास देणे आहे व उर्वरीत रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून माफ करण्यात येणार आहे. म्हणजेच रक्कम रूपये २०३.४१ कोटी पैकी रूपये ४८.९३ कोटी या योजने अंतर्गत भरल्यास उर्वरीत रक्कम माफ होऊ शकते. त्यास्तव प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: ४८ कोटीच रक्कम भरणा करावयाची आहे महानगरपालिकेवरील कर्ज कमी होईल. प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नाही.

मा.महापौर : या प्रस्तावास मंजूरी देण्यातयेते. पूढील कार्यवाही प्रशासनाने करावी.

श्री.संजय सिरसाट : ४८ कोटी रक्कम कशी व कोठून भरणा करणार आहे याचा खूलासा करण्यात यावा.

श्री.भागवत कराड : प्रस्ताव मंजूर करण्यात यावा .पून्हा प्रस्ताव या सभागृहासमोर येणारच आहे.त्यावेळी चर्चा करता येईल.

मा.महापौर : हा प्रस्ताव मंजूर करून शासनाकडे सदर योजनेची सवलत मिळविण्या करीता पाठवावयाचा आहे. शासनाने मान्यता दिल्यानंतर पून्हा प्रस्ताव मान्यतेसाठी या सभागृहासमोर येणार आहे. मा.आयूक्त शासनाशी चर्चा करतील मान्यता मिळाल्यानंतर पूढील कार्यवाही होणार आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासनाने उद्योग, उर्जा व कामगार विभागातर्फे शासन निर्णय बी.एल.ए.१००४/प्र.क्र./६११/उर्जा-४ मंत्रालय,मुंबई-३२ दिनांक १२.०७.२००४ अन्वये सार्वजनिक पिण्याच्या पाणी पुरवठा योजना यांना विज बिलाच्या थकबाकी द्यावयाच्या सवलती संदर्भात जाहीर केलेल्या '' सार्वजनिक नळ पाणी पुरवठा संजिवनी योजना '' सार्वजनिक नळ पाणी पुरवठा योजनेवरील विज बिलाच्या थकबाकीचा आर्थिक बोजा कमी करणे संदर्भात प्रस्तुत प्रस्तावातील वैशिष्ट्याप्रमाणे सदर योजनेनुसार निव्वळ थकबाकीच्या ५०% म्हणजेच रू.४८,९३,०१,४९०/- चा भरणा दहा समान हप्त्यात नियमित विद्युत बिला सोबत करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४/३ :**

मा.आयुक्त यांच्या मंजूरीने प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२००५ नुसार नव्याने निर्माण झालेल्या ९८ प्रभागाकरीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ अ (१) अनुसार सन २००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या विचारात घेवून कमीत कमी सहा प्रभाग समित्यांची रचना करणे आवश्यक असल्याने निवडणूक प्रभागाचा समावेश असलेल्या खालीलप्रमाणे सहा (०६) प्रभाग समित्या आणि त्यांचे कार्यालय प्रस्तावित करण्यांत येत आहेत.

| प्रभाग समिती क्रमांक | प्रभाग समितीत अंतर्भूत होणारे निवडणूक प्रभाग क्रमांक | एकूण प्रभागांची संख्या | प्रभाग समिती कार्यालयाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| अ | १,४ ते १३, ३० ते ३२, ३४ व ३५ | १६ | महानगरपालिका मुख्य कार्यालय प्रशासकीय इमारत टप्पा क्र.३ |
| ब | २,३, १४ ते २२, २४ ते २६ ४७ ते ४९ | १७ | सिडको एन ७ विभागीय कार्यालय विभाग क्र.७ |
| क | २७ ते २९, ४० ते ४६, ५१ ते ५७ | १७ | विभागीय कार्यालय विभाग क्र.-३ जाफरगेट |
| ड | ३३,३६ ते ३९, ५८ ते ६५,९१, ९४, ९५ | १६ | तात्पुरत्या स्वरूपात विभागीय कार्यालय विभाग क्र.४ क्रांतीचौक |
| इ | २३, ७० ते ८४ | १६ | विभागीय कार्यालय, विभाग क्र.५ चिकलठाणा |
| फ | ५०,६६ ते ६९,८५ ते ९०,९२,९३, ९६ ते ९८ | १६ | मालखरे बिल्डर्स कडून हस्तांतरीत झालेल्या गारखेडा येथील वास्तुमध्ये. |

करिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ अ (१) च्या अनुषंगाने प्रभाग समिती रचनेचा प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.ठाकुर पुरूषोत्तम : जनतेच्या हिताचा हा प्रस्ताव आहे. झोनचे सक्षमीकरण करावे. जनतेची कामे व्हावीत. योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

श्री.कराड भागवत : प्रभाग कमिटी संदर्भात प्रस्ताव आहे. या संदर्भात सर्व पदाधिकारी, मा.महापौर यांनी एकत्रित बसून यावर निर्णय घेण्यात यावा.

मा.आयुक्त : एकूण आठ झोन आहेत. झोन कार्यालयाचे क्षेत्र/हद्दीत बदल करून ८ झोन ऐवजी ६ वार्ड कार्यालय करून त्याचे सक्षमीकरण करावे लागेल, त्याठिकाणी झोनल ऑफिसर ऐवजी वार्ड ऑफिसर व एक वार्ड इंजिनीअर ठेवून देखभाल दुरूस्तीचे सर्व कामे करण्यात येईल. वार्ड समितीच्या हद्दीप्रमाणे वार्ड कार्यालयाची पुन: रचना करण्यासही मान्यता मिळावी.

मा.महापौर : दुरूस्तीसह मंजुर करण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ अ (१) च्या अनुषंगाने प्रभाग समिती रचनेच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| प्रभाग समिती क्रमांक | प्रभाग समितीत अंतर्भूत होणारे निवडणूक प्रभाग क्रमांक | एकूण प्रभागांची संख्या | प्रभाग समिती कार्यालयाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| अ | १,४ ते १३, ३० ते ३२, ३४ व ३५ | १६ | महानगरपालिका मुख्य कार्यालय प्रशासकीय इमारत टप्पा क्र.३ |
| ब | २,३, १४ ते २२, २४ ते २६ ४७ ते ४९ | १७ | सिडको एन ७ विभागीय कार्यालय विभाग क्र.७ |
| क | २७ ते २९, ४० ते ४६, ५१ ते ५७ | १७ | विभागीय कार्यालय विभाग क्र.-३ जाफरगेट |
| ड | ३३,३६ ते ३९, ५८ ते ६५,९१, ९४, ९५ | १६ | तात्पुरत्या स्वरूपात विभागीय कार्यालय विभाग क्र.४ क्रांतीचौक |
| इ | २३, ७० ते ८४ | १६ | विभागीय कार्यालय, विभाग क्र.५ चिकलठाणा |
| फ | ५०,६६ ते ६९,८५ ते ९०,९२,९३, ९६ ते ९८ | १६ | मालखरे बिल्डर्स कडून हस्तांतरीत झालेल्या गारखेडा येथील वास्तुमध्ये. |

तसेच ८ विभागीय कार्यालय बंद करून वरिल ६ प्रभाग समिती क्षेत्र / हद्दी प्रमाणे नविन ६ वार्ड कार्यालयाची स्थापना करणे, विभागीय अधिकारी ऐवजी वार्ड ऑफिसर हे पदनाम देणे व तेथे नियूक्त अभियंताना वार्ड अभियंता हे पदनाम देणे या दुरूस्तीसह वार्ड कार्यालय कार्यान्वित करण्यासही सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शहरातील वृक्ष लागवड व संवर्धनाच्या नियोजनाकरीता वृक्ष प्राधिकरण समितीचे गठण, महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्ष संवर्धन व जतन अधिनियम १९७५ (सुधारीत १९९६) नुसार नागरी स्थानिक प्राधिकरण ठरविल त्या कालावधी करिता मा.आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली वृक्ष प्राधिकरण समिती गठीत करणे करिता प्रस्तावित आहे.

सदर समितीमध्ये स.सदस्या मधुन कमीत कमी पाच व जास्तीत जास्त पंधरा सदस्यांची नियुक्ती मा.सभागृहाने करावयाची आहे.

वृक्ष प्राधिकरणाची निवड झाल्यास वृक्ष प्राधिकरणास या क्षेत्रातील अनुभवी व तज्ञ व्यक्तीस नामनिर्देशित सदस्य म्हणून नियुक्ती करता येईल. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.अब्दूल रशिद खॉन : या संबधी मा.महापौर यांनाच अधिकार देण्यात यावे कमेटी नियूक्त करावी निर्णय घेण्यात यावा.

श्री.विनायक पांडे : या प्रस्तावात शेवटी नमूद केले की, वृक्ष प्राधिकरण या क्षेत्रातील अनूभवी व तज्ञ व्यक्तीस नामनिर्देशीत सदस्य म्हणून नियूक्ती करता येईल. यासाठी कोणते निकष लावण्यात येणार आहे.

श्री भागवत कराड : पाच ही पदाधिकारी यांनी एकत्रीत बसून या संबधी निर्णय घ्यावा.
मा.महापौर : प्रस्ताव दूरूस्तीसह मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील वृक्ष लागवड व संवर्धनाच्या नियोजनाकरीता वृक्ष प्राधिकरण समितीचे गठण, महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्ष संवर्धन व जतन अधिनियम १९७५ (सुधारीत १९९६) नुसार नागरी स्थानिक प्राधिकरण ठरविल त्या कालावधी करिता मा.आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली वृक्ष प्राधिकरण समिती गठीत करणेस तसेच यासंबंधी पाचही पदाधिकारी यांनी एकत्रित बसून या संबंधी निर्णय घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

**विषय क्र. ३६/५ :**

सहाय्यक संचालक , नगर रचना , महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, भोगवटा प्रमाणपत्राच्या प्रस्तावात बांधकाम परवानगी पेक्षा विसंगत बांधकामा बाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम - १४३ नुसार दंड आकारणीची तरतुद आहे. त्यानुसार विद्यमान दंड आकारणीच्या धोरणात खालील प्रमाणे बदल सुचविणारा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे .

**(अ)** जोत्याच्या प्रमाणपत्राच्या प्रस्तावाचे वेळी मंजुरी पेक्षा विसंगत बांधकाम आढळल्यास आणि विकासकाने तडजोडीसाठी अर्ज केल्यास तसेच खालील शर्ती पूर्ण होत असल्यास;

**(i)** ग्राऊंड लेव्हल पार्किंग अेरीया कमी होत नसल्यास ,

**(ii)** बाजूंच्या समासात मंजुर बांधकाम परवानगी पेक्षा जास्त केलेले बांधकाम समासिक अंतराच्या ३३ % पेक्षा कमी असल्यास ,

**(iii)** मागील बाजूच्या समासात मंजूर बांधकाम परवानगी पेक्षा जास्त केलेले बांधकाम सामासिक अंतराच्या २० % पेक्षा कमी असल्यास

**(iv)** दि. ०१/०८/२००५ नंतरचे बांधकाम परवान्यात समोरील समासातिल अंतर मंजूर बांधकाम परवानगी प्रमाणेच असल्यास आणि दि. ०१/०८/२००५ च्या पूर्वीचे बांधकाम परवान्यात समोरिल सामासिक अंतर मंजूर बांधकाम परवानगी पेक्षा २० % पेक्षा कमी असल्यास .

**(A)** ज्या प्रकरणात जोत्याचे क्षेत्र (**Ground Coverage**) वाढत नाही अशा प्रकरणात बांधकामाचे बांधकाम परवाना शुल्क अधिक रूपये १०,००० /- इतकी दंडाची रक्कम आकारण्यात यावी .

**(B)** ज्या प्रकरणात जोत्याचे क्षेत्र (**Ground Coverage**) वाढत असल्यास व वाढीव बांधकाम अनुज्ञेय (**Ground Coverage**) च्या क्षेत्राच्या ५ % पेक्षा कमी असेल तर,वाढीव बांधकामास त्या मिळकतीच्या बाजार भावाच्या (शिघ्र सिध्द गणकाच्या) २५ % दराने रक्कम आणि रूपये १०,०००/- आणि बांधकाम परवाना शुल्क अशी रक्कम एकुण दंड म्हणून आकारण्यात यावी .

तसेच संबंधित वाढीव बांधकाम करणा-या बांधकाम धारकाने अंतिम बांधकाम क्षेत्र हे नियमानुकूल केलेल्या **एफ . एस. आय.** च्या. मर्यादेतच ठेवण्यात येईल या बाबत व नियमानुकूल केलेल्या बांधकाम परवानगी व्यतिरीक्त जादा बांधकाम केल्याने बांधकामाच्या

वेळी जमा केलेली अनामत रक्कम जप्तीस समंती देणे बाबत प्रतिज्ञापत्र देणे आवश्यक आहे.

(ब) जोत्याचे प्रमाणपत्र न घेता अतिमत: भोगवटा प्रमाणपत्राच्या वेळी मंजुरी पेक्षा विसंगत बांधकाम आढळल्यास आणि विकासकांने तडजोडीसाठी अर्ज केल्यास तसेच खालील शर्ती पूर्ण होत असल्यास ,

**(i)** ग्राऊंड लेव्हल पार्किंग अेरीया कमी होत नसल्यास ,

**(ii)** बाजूंच्या समासात मंजुर बांधकाम परवानगी पेक्षा जास्त केलेले बांधकाम समासिक अंतराच्या ३३ % पेक्षा कमी असल्यास ,

**(iii)** मागील बाजूच्या समासात मंजूर बांधकाम परवानगी पेक्षा जास्त केलेले बांधकाम सामासिक अंतराच्या २० % पेक्षा कमी असल्यास

**(iv)** दि. ०१/०८/२००५ नंतरचे बांधकाम परवान्यात समोरील समासातिल अंतर मंजूर बांधकाम परवानगी प्रमाणेच असल्यास आणि दि. ०१/०८/२००५ च्या पूर्वीचे बांधकाम परवान्यात समोरिल सामासिक अंतर मंजूर आंधकाम परवानगी पेक्षा २० % पेक्षा कमी असल्यास .

**(v)** जर जोत्याचे क्षेत्र (**Ground Coverage**) वाढत नसल्यास व वाढीव बांधकाम अनुज्ञेय क्षेत्राच्या ५ % पेक्षा कमी असेल तर

**(A)** भोगवटा प्रमाणपत्राच्या प्रस्तावात बांधकाम परवानगी व्यतिरीक्त केलेले ज्यादाचे बांधकाम त्या मिळकतीच्या अनुज्ञेय बांधकाम क्षेत्राच्या ५ % मर्यादे पर्यत जास्तीचे असल्यास त्यास बाजारमुल्य (शिघ्र सिध्द गणकांच्या) १०० % दराने दंडाची रक्कम आकारून नियमानुकूल करण्यात येईल

**(B)** बांधकाम परवानगीमध्ये बेसमेंट्या वापर स्टोअर करीता अनुज्ञेय केला असतांना प्रत्यक्षात बेसमेन्टचा वापर वाणिज्य उपयोगी करीत असल्याचे आढल्यास , बेसमेंन्टच्या वापरा मुळे एफ .एस.आय मर्यादेच्या ५ % पेक्षा जास्त वाढ होत नसल्यास अशा बेसमेन्टच्या वाणिज्य वापरास नजराणा शुल्क हे एक रक्कमी त्या मिळकतीच्या बाजार मुल्याच्या (शिघ्र सिध्द गणकाच्या ) १२५ % दराने रक्कम आकारण्यात यावी.

वरील प्रमाणे बदल प्रस्तावीत करून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम - १४३ अन्वये वापरात असलेल्या विद्यमान दंडात्मक कार्यवाहीच्या धोरणात बदल सुचविणारा सादर करण्यात येत असून त्यास मान्यता देण्यात यावी, प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

<u>संवाद :</u>

श्री.दिलीप गायकवाड : या प्रस्तावास माझा विरोध असून हा प्रस्ताव शहर सूधार समिती मार्फत यायला पाहीजे.

श्री.संतोष खेंडके : हा प्रशासकीय प्रस्तावआहे शहर सूधार समिती अंतर्गत येतो.

मा.महापौर : यानंतर नगररचना विभागाचे प्रशासकीय जे काही प्रस्ताव असतील ते शहर सूधार समिती मार्फत ठेवण्यात यावे.

मा.आयूक्त : कंपाऊडींगचे अधिकार प्लॅनींग ऑथर्टी म्हणून सर्वसाधारणा सभेस आहे म्हणून प्रस्ताव ठेवलेला आहे सर्वसाधारणा सभेचे अधिकार असल्यामूळे शहर सूधार समिती मार्फत आणलेला नाही.

श्री.दिलीप गायकवाड : प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात यावा.पूढील सभेत घेण्यात यावा.

श्री.मनमोहनसींग ओबेरॉय: हा प्रस्ताव १९९७ ला मंजूर झालेला होता तेव्हापासून २००३ पर्यत कार्यवाही केलेली नाही आज पून्हा ठराव समोर येतो आहे या मागचे कारण काय महसूल वाढविण्याच्या दृष्टीने ठेवलेला आहे का खुलासा करण्यात यावा.

मा.आयुक्त : महसूल वाढविण्याचा उद्देश नाही परंतू किरकोळ कारणामूळे सामासिक अंतरात बदल होऊ शकते. किरकोळ कारणामूळे जर कोणत्याही इमारतीचे अंतिम प्रमाणपत्र देणे,भोगवटा प्रमाणप्रत्र देणे शक्य होत नसेल तर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये कंपाऊडींग करावे, अशी तरतूद आहे. त्या संबधीचे अधिकार सर्वसाधारण सभेला आहे. कपांऊडींग करतावेळी माझे मत असे की केस बेसीसवर न करता जनरल निर्णय घ्यायला पाहिजे पूर्वी जो प्रस्ताव मंजूर केला त्यात फ्रन्ट मार्जीनला सूट दिली होती. ती सूट देण्यात येउ नये म्हणून काही बदल सूचविण्यात आलेले आहे. १००टक्के लोक इमारत बांधकाम परवानगी घेतात त्यापैकी १५ टक्केच लोक भोगवटा प्रमाणपत्रासाठी येतात. यातील काही इमारती त्या संबधीत बिल्डरांनी विक्री सूध्दा केल्या,भोगवटा सुरू केलेला आहे. जर किरकोळ कारणामूळे भोगवटा प्रमाणपत्र महानगरपालिकेने दिले नाही तर विकत घेणाऱ्यांना त्रास होतो या पूढे जास्तीचे दंड आकारणी होणार आहे.यात १२५ टक्के नमूद केलेला रेडीरेकनरचे जे पैसे मिळणार आहे त्याचे १२५टक्के भरावे लागणार आहे प्रशासनाचा इमारत नियमित होण्याचा आहे. किरकोळ कारणामूळे राहीलेले आहे पार्कींगला काही करणार नाही एफएसआय ०.५ टक्के पेक्षा जास्त असेल त्यास हात लावणार नाही आणि फ्रन्ट मार्जीन जो मागच्या ठरावात होते ते ड्राप केलेला आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: अशी कार्यवाही करणार असेल तर कोणीही येणार नाही. १९९७ च्या ठरावानूसार कार्यवाही व्हावी.

मा.आयूक्त : आतापर्यंत जे बांधकाम झालेले आहे. २५ टक्के आहे. यापुढे नविन प्रकरणांसाठी १०० % द्यावे लागेल.

श्री.पूरूषोत्तम ठाकूर : प्रस्ताव चांगला आहे कपांऊडींग दर कमी करावे. जेणे करून जास्त लोक येतील व महापालिकेस उत्पन्न मिळेल.

श्री.दिलीप गायकवाड : शहरात बऱ्याच ठिकाणी अनधिकृत इमारती उभ्या आहेत जी जागा पार्कींगसाठी होती त्या जागेवर लोक व्यवसाय करीत आहे.

मा.महापौर :पार्कींगच्या बाबतीत कूणावर ही दया केली जाणार नाही जर कंपाऊड आहे बेसमेन्ट आहे ते जर ०.५टक्के मध्ये असेल तर पार्कींगसाठी कूठलीही जागा राहणार नाही.

सौ.लता दलाल :जेथे बांधकाम झालेले असेल व पार्कींगच्या जागेवर बांधकाम केले असेल किंवा बेसमेन्ट केले असेल या नियमाप्रमाणे काही टक्के माफ करणार उर्वरीत बांधकाम असेल तर त्याबाबतीत काय कार्यवाही होणार आहे.

मा.आयूक्त :बेसमेन्ट मधे पार्कींग किंवा स्टोअर साठी अनुज्ञेय करतो परंतू त्या ऐवजी त्या जागेवर वाणिज्य वापर केला असेल तर दंड आकारणी होणार परंतू पार्कींगच्या जागेवर प्लॅनमधे न दाखविता भिंत तयार केली किंवा इतर बांधकाम केले व पार्कींगची जागा कमी केली असेल तर ते त्यांना काढावे लागेल.पार्किंगच्या जागेत कमी जास्त झाले असेल तर ते कपांऊडींगमध्ये येणार नाही.

सौ.लता दलाल :काहीनी इमारत बांधकाम केले भोगवटा प्रमाणापत्र घेतल्यानंतरही बांधकाम केलेले आहे त्या बाबतीत प्रशासन सर्वे वगैरे करणार आहेत का माहिती देण्यात यावी.

| | |
|---|---|
| मा.आयूक्त | : असे बांधकाम हे अनधिकृत होईल यात तो विषय नाही. |
| सौ.लता दलाल | : १९९४ ला एफएसआय संदर्भात सर्वोच्च न्यायालयाचा काही निर्णय झालेला आहे, त्यानूसार शासनाकडून जीआर प्राप्त झालेला आहे का माहिती दयावी. |
| श्री.अब्दूल रशीद खॉन | : आजचे दर काय आहेत यांचा उल्लेख केलेला नाही.या पूढे कोणते दर आकारणार आहात ,दंड आकारणी होणार त्यांना सूविधा काय देणार आहात आताच स.सदस्य यांनी काही भागात १५ वर्षापासून इमारती झाल्या परंतू तेथे पाणीपूरवठा होत नाही.जनतेकउून पैसा जमा करणार सूविधा काय देणार याचा खुलासा व्हावा.डिपॉजीटही घेणार दंड आकारणीही करणार एकाच वेळी दोन शिक्षा होते. एखादी इमारत दोन तीन वर्षापूर्वी बांधकाम केले सदर व्यक्ती मनपाकडे आल्यास पूर्वीच्या दराने वसूल करणार की नवीन दराने खूलासा करावा. |
| मा.आयूक्त | : हे प्रपोजल नवीन दरानूसार आहे आणि हा दंड आकारणी करणार आहोत सवलत देत नाही. |
| श्री.अब्दूल रशीद खॉन | :दंड आकारणी किती करणार आहात जास्तीचे केल्यास कुणीही स्वत:हून येणार नाही. |
| मा.आयूक्त | : एफएसआय वापरणे कमी झाले तर कमी झाल्यास पूढे पण असेच चालत राहील. |
| श्री.अब्दुल रशीद खॉन | : यापूर्वी २५० होते आता ५०० करण्यात यावे. |
| श्री.संजय केनेकर | : कपाऊडींग दर २५० होते आता ३०० करण्यात यावे आर-१ आर-२ असे वेगळे करावे ही समस्या उद्‌भवणार नाही. |
| श्री.भागवत कराड | : या शहरात जवळपास २५टक्के इमारती या अनधिकृत रित्या झालेल्या आहेत.परवानगी घेतलेली नाही. त्याबाबतीत काय कार्यवाही घेणार आहेत. जे रेग्यूलर परवानगी  घेत आहे कम्प्लेशनला येत आहे त्यांना यापासून सवलत मिळत असेल तर मंजूर करण्यात यावे.जे अनधिकृत आहे त्यांना परवानगी कशी देता येईल किंवा गुंठेवारीत नुसार कार्यवाही करता येत असेल तसे करावे त्यांना सूध्दा टॅक्स लावून कार्यवाही करावी. |
| श्री.प्रशांत देसरडा | :माझ्यामते ५ टक्के सरळ सरळ एफएसआय वाढवून देण्या संदर्भात हा प्रस्ताव आहे.याचा अर्थच तसा होतो. या सभागृहाने मंजूर केल्यानंतर ही लागू होईल का याचाही प्रशासनाने खूलासा करावा.यात ५ टक्केच एफएसआय सूधारीत करून दंड आकारावा असा मूद्‌दा आहे. हा प्रस्ताव वाचल्यानंतर माझे स्वत: चे मत असे झाले की,अनेक ठराव या विभागाचे मी वाचले परंतु आजच्या या प्रस्तावातील वाक्यरचना वेगळीच वाटत आहे.जो अभ्यासूपणा असतो तो या प्रस्तावात या विभागाचा दिसून येत नाही.यात लहान मोठया चूका असण्याची शक्यता आहे.जेव्हा मा.आयूक्ताकडे संचिका आली असेल तेंव्हा नगररचना विभागाचे मत घेतलेच असेल हा प्रस्ताव गोलमोल दिसून येत आहे.नेमके ५ टक्केसाठी महानगरपालिकेकडे कोणीच येणार नाही.५ टक्केमधे एका इमारतीची भिंत सूध्दा होत नाही.तर या प्रस्तावावर  अभ्यास करून ठेवला असता तर योग्य झाले असते तसेच या संदर्भाची यादी प्रशासनाकडे आहे का ?अशा किती मालमत्ता आहेत की त्यांनी भोगवटा प्रमाणपत्र घेतलेले नाही.सामान्य नागरीक परवानगी घेऊन जातात त्यांचा फायदा होत असेल तर हा प्रस्ताव आवश्य मंजूर करण्यात यावा.१०० परवानगी मध्ये ५० परवानगी सामान्य नागरीकांच्या आहेत सिंगल परवानगी त्यांनी घेतलेली आहे.त्यांनाच हा लागू करावा यात व्यावसायीकदृष्टया कोठे रूपांतर होणार नाही.शासन नियमानूसार काही अडथळा होत असेल त्यांना ते लागू होते.परंतू याचा चूकीचा यूज या ठिकाणी करण्यात आलेला आहे.यात ५ टक्केच |

सूधार करीत आहोत.जे सिंगल परवानगी धारक आहेत त्यांनाच हा लागू करण्यात यावा.असे माझे स्वत:चे मत आहे.

मा.आयूक्त : इमारत कोणी बांधली तरी त्यात आपले नागरीकच राहतात.फ्लॅट सिस्टीम असेल तर तेथे सामान्य नागरीकच राहतात.किंवा पूर्ण आयूष्याचे पैसे टाकून विकत धेणारे पण सामान्य व्यक्तीच असतात.१.०५ टक्के असे सरसकट होउ नये ते करण्याचे अधिकार सूध्दा नाही जर करायचेच झाल्यास त्या बाबतीत ठराव घेऊन हरकती मागवून शासनाकडे पाठवावे लागेल.१.०५ हे होऊ नये म्हणून जास्त दर लावण्यात आलेले आहे.कपांऊडीगचा गैरफायदा कोणी घेऊ नये म्हणून दंडात्मक रक्कम जास्त लावण्यात आलेली आहे.दंडात्मक रक्कम कमी असेल तर सर्वच १.०५ प्रमाणे बांधतील दंडात्मक रक्कम भरतील व कंपाउडींगचे बांधकाम करतील.जी जूने प्रकरण आहे त्यासाठी काही तरी फिक्स रक्कम केली तरी चालेल.परंतू यापूढे तसे होऊ नये म्हणाून १००टक्के रेडीरेकनरप्रमाणे घ्यावे १.०५टक्केपेक्षा जास्त बांधकाम केले याचा अर्थ कोणास तरी बांधकाम करून विक्री केलेले आहे.दंडाची रक्कम जास्त असावी यापूढे कोणी तसे करणार नाही.ज्या जून्या केसेस आहे त्याांचेवर आजच्या रेडीरेकनर प्रमाणे रक्कम आकारल्यास फारच जास्त होऊ शकते हे मान्य आहे.परंतू पूर्ण शहरात वेगवेगळी रक्कम होऊ शकेल वेगवेगळी किमत जमिनीची आहे.जर निरालाबाजार मध्ये कोणी जास्त बांधकाम केले असेल तर तेथील किमंत फारच जास्त आहे.चिकलठाणा भागात केले असेल त्याची किमंत कमी असेल.म्हणून रेडीरेकनर वापरला आहे तो शासनाचा आहे.पूर्ण शहरात वेगवेगळे दर लागू आहेत.१.०५ हे सरसकट होत नाही. सर्वाना लागू होईल.

श्री.अब्दूल रशीद खॉन : आर-१ आर-२ असे वेगवेगळे करावे लागणार आहे जे मोठमोठे बिल्डर्स आहेत त्यांचे संचिका गायब आहेत त्यांचेकडेच त्यासंचिका जातात.गरीब लोकांच्या संदर्भात मी बोलत आहे.त्यांचेवर अन्याय होता कामा नये.जे बिल्डर एकदम १०० घरे तयार करीत आहेत त्यांचेसाठी जास्त ठेवावे.

मा.आयुक्त : कपांउडींग दर डिसाईड करू शकतात परंतू नवीन कामाना जास्तच ठेवावे.

श्री.दिलीप गायकवाड : १० वर्षात अनेक भागात अनधिकृत इमारती झालेल्या आहेत त्याचे बाबतीत काय कार्यवाही करणार आहेत.

श्री.नरवडे वसंत : आर-१ आर-२ चे कपांउडींग दर सारखेच ठेवावे.

मा.महापौर : सप्टेबर अखेर पर्यत जे भोगवटा प्रमाणपत्रासाठी यतील त्यांना १०टक्के सूट दिली जाईल.

श्री.वसंत नरवडे : जुन्या शहरात बेसमेन्टच्या जागा स्टोअरसाठी दिल्या तेथे दूकाने चालू आहे जेथे वाणिज्य वापर चालू आहे तेथे १२५टक्के दिले ५टक्के खाली नाही. पार्कीग नसून स्टोअरच्या जागेत दूकाने चालू आहे .त्यांचेसाठी काय दर आकारणार आहात.बिल्डरांनी जागा घेतली बांधकाम केले आणि विक्री केली जो दूकानदार अस्तित्वात आहे त्याची इतकी रक्कम भरण्याची तयारी दर्शविल का ?१२५टक्के प्रमाणे रक्कम भरू शकेल का, त्यांनी दूकान बंद करून त्यास रस्त्यावर आणणार का ?

मा.महापौर : १२५ टक्के प्रमाणेचे जे रूलींग दिले ते दिं.१.८.२००५ च्या नंतर साठी आहे लोकांनी स्टोअर मधे बेसमेन्टमधे दूकाने काढू नये म्हणून १२५टक्के देत आहे बेसमेंन्टचा वापरात काही बदल करून नियमीत करता येत असेल तर २-३ महिण्यात तसा प्रस्ताव सभागृहासमोर ठेवावा.

श्री.वसंत नरवडे : बेसमेन्टमधे ५टक्के पेक्षा जास्त वापर असल्यास काय करणार आहे त्यांना १०टक्केतरी किमान करावे.

मा.आयूक्त : एफएसआय वाढवू शकत नाही.

श्री.नरवडे वसंत : जून्या शहरात बिल्डरांनी जागा घेऊन दूकाने केली .ती गरीबांना विक्री केले तेथे ५ टक्के ऐवजी १० टक्के असेल तर सदर व्यक्ती बँकेचे कर्जधारकही आहे व महापालिकेचा टॅक्स ही भरणा करेल त्यास येणारे उत्पन्न सुध्दा तेवढे असणार नाही .यामूळे सूशिक्षित बेकार रस्त्यावर येतील.

मा.आयूक्त : पूर्ण कन्स्ट्रक्शनच्या एफएसआयची टक्केवारी आहे नूसती बेसमेन्टची नाही.

श्री.भागवत कराड :असे केल्यास सर्व बेसमेन्ट रेग्यूलर होतील बांधकाम करतांना जर ५टक्के बांधलेले असेल तर त्यांना परवानगी दयावी बेसमेन्टला परवानगी दयावी.

मा.महापौर : ०१. दिनांक ०१.०८.२००५ पर्यंत ज्यांना बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे, अशा सर्व प्रकरणात भोगवटा प्रमाणपत्रासाठी प्राप्त होणारे प्रकरणामध्ये खालील प्रमाणे कंपाऊडींग दंड आकारण्यात यावा.

आर-१ निवास वापरासाठी रू.५००/- प्रति चौ.मी., वाणिज्य वापरास रू.७५०/- प्रती चौ.मी.

आर-२ निवास वापरासाठी रू.३००/- प्रति चौ.मी., वाणिज्य वापरास रू.५००/- प्रती चौ.मी.

०२. दिनांक ०१.०८.२००५ नंतर दाखल झालेल्या बांधकाम परवानगीच्या प्रकरणांत भोगवटा प्रमाणपत्र घेतांना कंपाऊडींग चार्जेस दंड सिध्द शिघ्र गणक (रेडी रेकनर ) दराच्या ५०%

०३. बांधकाम परवानगीमध्ये बेसमेंटचा वापर बदलत असेल अशा प्रकरणांत दिनांक ०१.०८.२००५ पर्यंत बांधकाम परवानगी दिलेल्या प्रकरणांत एम.एस.आय.च्या मर्यादित ५% पेक्षा जास्त वाढ होत नसेल तर खालीलप्रमाणे कंपाऊंडीग दंड आकारण्यांत यावा.

आर-१ मध्ये रूपये ७५०/- प्रति चौ.मी.

आर-२ मध्ये रूपये ५००/- प्रति चौ.मी.

०४. ०१.०८.२००५ नंतर वाणिज्य वापरासाठी सिध्द शिघ्र गणक (रेडी रेकनर ) दराच्या १२५%

०५. बांधकाम परवानगीच्या वेळेस अनामत रक्कम म्हणून जमा केलेली रक्कम ही वरील दंडाच्या रक्कमेपेक्षा कमी असेल तर फरकाची रक्कम भरून घेण्यात यावी. परंतू दंडाच्या रक्कमेपेक्षा अनामत रक्कम जास्त असेल तर ती महानगरपालिकेकडे संपूर्णपणे वळती करण्यात यावी. अशा प्रकरणांत अनामत रक्कम दंडाच्या रक्कमेपेक्षा जास्त होत असली तरी मिळकत धारकाला परत केली जाणार नाही. ३० सप्टेबंर २००५ पर्यंत दाखल होणाऱ्या प्रकरणांत १०% सूट देण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,दिनांक १.०८.२००५ पर्यंत ज्यांना बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे,अशा सर्व प्रकरणात भोगवटा प्रमाणपत्रासाठी प्राप्त होणारे प्रकरणामध्ये खालील अटीस अधीन राहून

**(i)** ग्राऊंड लेव्हल पार्किंग अेरीया कमी होत नसल्यास ,

**(ii)** बाजूंच्या समासात मंजुर बांधकाम परवानगी पेक्षा जास्त केलेले बांधकाम समासिक अंतराच्या ३३ % पेक्षा कमी असल्यास ,

**(iii)** मागील बाजूच्या समासात मंजूर बांधकाम परवानगी पेक्षा जास्त केलेले बांधकाम सामासिक अंतराच्या २० % पेक्षा कमी असल्यास

**(iv)** दि. ०१/०८/२००५ नंतरचे बांधकाम परवान्यात समोरील समासातिल अंतर मंजूर बांधकाम परवानगी प्रमाणेच असल्यास आणि दि. ०१/०८/२००५ च्या पूर्वीचे बांधकाम परवान्यात समोरिल सामासिक अंतर मंजूर आंधकाम परवानगी पेक्षा २० % पेक्षा कमी असल्यास.

वाढीव बांधकाम अनुज्ञेय बांधकाम क्षेत्राच्या ५% मर्यादिपर्यंत खालील प्रमाणे कंपाऊडींग दंड आकारण्यात यावा. ३० सप्टेंबर २००५ पर्यंत दाखल होणाऱ्या प्रकरणांत १०% सूट देण्यांत येईल.

आर-१ निवास वापरासाठी रू.५००/- प्रति चौ.मी., व निवासेत्तर वापरासाठी रू.७५०/- प्रति चौ.मी., आर-२ निवास वापरासाठी रू.३००/- प्रति चौ.मी. व निवासेत्तर वापरासाठी रू.५००/- प्रति चौ.मी. (०२) दिनांक ०१.०८.२००५ नंतर दाखल झालेल्या बांधकाम परवानगीच्या प्रकरणांत भोगवटा प्रमाणपत्र घेतांना वरिल अटीस पात्र राहून कंपाऊडींग चार्जेस सिध्द शिघ्र गणक (रेडी रेकनर ) दराच्या ५०%, (०३) बांधकाम परवानगीमध्ये बेसमेंटचा वापर बदलत असेल अशा प्रकरणांत दिनांक ०१.०८.२००५ पर्यंत बांधकाम परवानगी दिलेल्या प्रकरणांत वरिल अटीस पात्र राहून खालीलप्रमाणे कंपाऊंडीग दंड आकारण्यांत यावा. आर-१ मध्ये रूपये ७५०/- प्रति चौ.मी., आर-२ मध्ये रूपये ५००/- प्रति चौ.मी., (०४) ०१.०८.२००५ नंतरच्या बांधकाम परवानगीच्या प्रकरणात वाणिज्य वापरासाठी सिध्द शिघ्र गणक (रेडी रेकनर ) दराच्या १२५%, (०५) बांधकाम परवानगीच्या वेळेस अनामत रक्कम म्हणून जमा केलेली रक्कम ही वरील दंडाच्या रक्कमेपेक्षा कमी असेल तर फरकाची रक्कम भरून घेण्यात यावी. परंतू दंडाच्या रक्कमेपेक्षा अनामत रक्कम जास्त असेल तर ती महानगरपालिकेकडे संपूर्णपणे वळती करण्यात यावी. अशा प्रकरणांत अनामत रक्कम दंडाच्या रक्कमेपेक्षा जास्त होत असली तरी मिळकत धारकाला परत केली जाणार नाही. यास अधिन राहून दंडात्मक कार्यवाहीच्या धोरणात बदल करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७/६ :**

सहाय्यक संचालक , नगर रचना , महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, महाराष्ट्र शासनाचे आदेश क्रमांक टी.पी.बी.४३०३/१३/प्र.क्र./२४९/०३/न.वि.११ दिनांक १७ जुन २००४ यानी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये रहीवासी वापराचे इमारती मध्ये फिटनेस सेंटर विकसीत होण्यासाठी विकास नियंत्रण नियमावली मध्ये बदल प्रस्तावीत करण्याचे निर्देश दिले आहेत

**शासनाचे निर्देश पूढील प्रमाणे ,**

रहिवास वापराच्या इमारतीमध्ये फिटनेस सेंटर विकसित होण्याच्या दृष्टीने सदर वापर Free of FSI (सोबत जोडलेल्या प्रपत्रानुसार) अनुज्ञेय करण्यात यावे. त्यानुसार सर्व नियोजन प्राधिकरणे, विशेष नियोजन प्राधिकरणांनी त्यांच्या विकास नियंत्रण नियमावलीत (सोबत जोडलेल्या बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीत करावयाच्या फेरबदलाचा तपशील प्रमाणे ) विहित ठिकाणी तरतुद करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाच्या कलम ३७ (१) अन्वये फेरबदलाचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी तात्काळ पाठवावा .

शासनाच्या वरील निर्देशा प्रमाणे शासन मंजुर विकास नियंत्रण नियमावली मध्ये पुढील प्रमाणे बदल प्रस्तावीत करण्यात येतात .

Following new sub-clause [i] shall be added after sub clause [h] of regulation 15.4.2 pertaining to exclusion from F.S.I. computation of the Development Control Regulation for Aurangabad Municipal Corporation .

**[i]** Area of one fitness centre for a Co-op Housing Society or Apartment Owners Association as provided in sub-regulation 17.21

**[ii]** Following new sub-clause [17.21] shall be added after sub-clause [17.20]

of Regulation 17 pertaining to requirement of building of the Development Control Regulation for Aurangabad Municipal Corporation . **[17.21]** In every residential building, constructed or proposed to be constructed for the use of a Co-operative Housing Society or an Apartment Owners Association , a fitness centre room will be permitted. The area of the room shall be limited to 2 [two] percent of the total builtup area of building or 20 sq.mt., whichever is more . It shall not be used for any other purpose, except for fitness activities and its ownership shall vest to society or association.

शासनाच्या निर्देशानूसार शासन मंजूर विकास नियंत्रण नियमावली मध्ये वरील प्रमाणे फेरबदल महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी व त्यामध्ये अधिसूचना प्रसिध्द करून हरकती व सूचना मागवून अंतिम प्रस्ताव शासनास सादर करण्याचे अधिकार आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना देण्यात यावे .

प्रस्ताव मान्यते करीता सादर.

**संवाद :**

| | |
|---|---|
| श्री.भागवत कराड | : जर फिटनेस रूम किंवा फिटनेस इतर बांधावयाचे असेल तर महानगरपालिकेच्या वतीने त्यास काही तरी चार्जेस आकारण्याची गरज आहे असे माझे मत आहे यामूळे महापालिकेस उत्पन्न मिळेल. |
| श्री.वसंत नरवडे | :डेव्हलपमेन्ट प्लॅन नूसार झालेले हे शहर आहे जेव्हा एखादया बांधकाम दूरूस्तीची परवानगीची कोणी मागणी करील तेंव्हा ती देण्यात येऊ नये.डी.पी प्लॅन नुसार रस्ते झालेले असतांना काही लोक परवानगी घेतात व दूकाने रस्त्यावर तयार करतात त्यामूळे दूरूस्तीचे काम म्हणून यापूढे परवानगी देउ नये. |
| श्री.मुजीब खॉन | : डी.पी.प्लॅन नूसार फीस घेण्या संदर्भातचर्चा होत आहे.डी.पी रोडवर जागा घेउन वाटाघाटी करून जागा घेतल्या असतील व त्या जागेतील इमारतीचा काही मागचा भाग शिल्लक असेल त्यांना दंड आकारणी होउ नये ज्यांचेकडून जागा वाटाघाटी करून घेतली त्यांना दंड आकारणी करू नये त्याचेवर अन्याय होईल. |
| मा.आयूक्त | : उदा रस्त्यामधे जागा आलेली त्यांना एफएसआय जास्त दिलेला आहे त्यांना १.४टक्के एफएसआय ऑलरेडी आहे त्यावर ५टक्के आकारणी होईल. |
| श्री.मूजीब खॉन | : डी.पी.प्लॅन नूसार वाटाघाटी करून एखादयाचे ४०टक्के मालमत्ता गेली ६० टक्केच शिल्लक आहे त्यांचेवर ५टक्के १०टक्के आकरणी करणार का ? |
| मा.आयूक्त | :हार्टशिप पाहून निर्णय घेता येईल. |
| श्री.भागवत कराड | : विषय क्र ६ फिटनेस सेंटरसाठी मंजूर करावे परंतू १०,०००/-रूपये डिपॉजीट घेण्यात यावे. |
| मा.महापौर | : ठीक आहे. रूपये १०,०००/- डिपॉजीट घेण्यात यावे विषय मंजूर करण्यात येत आहे. |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासनाच्या निर्देशानूसार शासन मंजूर विकास नियंत्रण नियमावली मध्ये फिटनेस सेंटरचा वापर प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चटई क्षेत्र निर्देशाकांतून सूट देता यावी,यासाठी विकास नियंत्रण नियंत्रण नियमावलीत नविन नियम करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास तसेच त्यामध्ये अधिसूचना प्रसिध्द करून हरकती व सूचना मागवून अंतिम प्रस्ताव शासनास सादर करण्याचे अधिकार मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, तसेच बांधकाम परवानगीचे वेळी रूपये १०,०००/- अनामत रक्कम घेण्यासही मंजूरी देण्यांत आली, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८/७ :**

सहाय्यक संचालक , नगर रचना , महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, महाराष्ट्र शासनाचे आदेश क्रमांक टी.पी.बी ४३/००१/२१३३/सी.आर-२३०/०१/यु.डी.११ /नगर विकास विभाग मुंबई . दिनांक १० मार्च २००५ नूसार महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १५४ अन्वये नियोजन प्राधिकरणास रेन वॉटर हार्वेन्टींग सीस्टीम बसविणे बाबत विकास नियंत्रण नियमावलीत तरतुद करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत .

**शासनाचे निर्देश पूढील प्रमाणे ,**

All the Planning Authorities/ Development Authorities should initiate a modification proposal under section 37 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 of the existing development control regulations to incorporate special provision for installation of Rain Water Harvesting Scheme [as per Annexure A appended herewith] and submit the same to the Government for approval.

Pending formalities of completion of section 37 of the Maharashtra Regional and Town Planning Act , 1966 , the Government hereby directs under section 154 of the MR&TP Act , 1966 that this provision shall be brought into force immediately till the modification proposal is sanctioned by the Government.

शासनाच्या वरील निर्देशानुसार शासन मंजुर विकास नियत्रंण नियमावली मध्ये रेन वॉटर हार्वेन्टींग सीस्टीम बसविणे बाबत नविन नियमाची तरतुद करण्यात येत असून सदरील नियमास (Appendix V) संबोधण्यात येईल प्रस्तावीत शेडयूल खालील प्रमाणे

**"APPENDIX V"**

**RAIN WATER HARVESTING**

Rain Water Harvesting in a building site includes storage or recharging into ground of rain water falling on the terrace or on any paved or unpaved surface within the building site.

01. The following systems may be adopted for harvesting the rain water drawn from terrace and the paved surface .

[i] **Open well** of a minimum of 1.00 mt.dia and 6 mt. in depth into which rain water may be channeled and after filtration for removing silt and floating material. The well shall be provided with ventilating covers. The water from the open well may be used for non potable domestic purposes such as washing flushing and for watering the garden etc.

[ii] Rain water harvesting for recharge of ground water may be done through a **bore well** around which a pit of one metre width may be excavated upto a depth of at least 3.00 mt. and refilled with stone aggregate and sand. The filtered rain water may be channeled to the refilled pit for recharging the bore well.

[iii] An impervious surface / underground storage tank of required capacity may be constructed in the setback or other open space and the rain water may be channeled to the storage tank. The storage tank shall always be provided with ventilating covers and shall have draw-off taps suitably placed so that the rain water may be drawn off for domestic, washing , gardening and such other purposes . The storage tanks shall be provided with an overflow.

[iv] The surplus rain water after storage may be recharged into ground through percolation pits or trenches or combination of pits and

trenches. Depending on the geomorphological and topographical condition, the pits may be of the size of 1.20 mt. width X 1.20 mt. length X 2.00 mt. to 2.50 mt. depth . The trenches can be of 0.60 mt. width X 2.00 to 6.00 mt. length X1.50 mt. to 2.00 mt. depth. Terrace water shall be channeled to pits or trenches. Such pits or trenches shall be back filled with filter media comprising the following materials.

a] 40 mm stone aggregate as bottom layer upto 50 % of the depth ;

b] 20 mm stone aggregate as lower middle layer upto 20 % of the depth ;

c] Coarse sand as upped middle layer upto 20 % of the depth ;

d] A thin layer of fine sand as top layer ;

e] Top 10 % of the pits/ trenches will be empty and a splash is to be provided in this portion in such a way that roof top water fall on the splash pad.

f] Brick masonry wall is to be constructed on the exposed surface of pits/ trenches and the cement mortar plastered .
The depth of wall below ground shall be such that the wall prevents lose soil entering into pits/ trenches. The projection of the wall above ground shall at least be 15 cms.

g] Perforated concrete slabs shall be provided on the pits/ trenches.

[v] If the open space surrounding the building is not paved , the top layer upto a sufficient depth shall be removed and refilled with course sand to allow percolation of rain water into ground .

02. The terrace shall be connected to the open well/ bore well/ storage tank/ recharge pit/ trench by means of HDPE/PVC pipes through filter media . A valve system shall be provided to enable the first washings from roof or terrace catchment, as they would contain undesirable dirt . The mouths of all pipes and opening shall be covered with mosquito [insect] proof wire net. For the efficient discharge of rain water , there shall be at least two rain water pipes of 100 mm dia . for a roof area of 100 sq. Mt.

03 Rain water harvesting structures shall be sited as not to endanger the stability of building or earthwork. The structures shall be designed such that no dampness is caused in any part of the walls or foundation of the building or those of an adjacent building .

04 The water so collected/ recharged shall as far as possible be used for non-drinking and non-cooking purpose.

Provide that when the rain water in exceptional circumstances will be utilized for drinking and / or cooking purpose, it shall be ensured that proper filter arrangement and the separate outlet for by passing the first rain - water has been provided.

Provided further that it will be ensured that for such use, proper disinfectants and water purification arrangements have been made.

राज्य शासनाच्या वरील निर्देशाप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या शासन मंजुर विकास नियंत्रण नियमावली मध्ये (Rain Water Harvesting System) बसविणे बाबत तरतुद करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ प्रमाणे फेरबदल करण्याच्या प्रस्तावास मान्यता व्हावी.

मान्यते नंतर अधिसूचना प्रसध्दि करणे हरकती व सूचना मागविणे तद्नंतर अंतिम प्रस्ताव शासनाच्या मान्यतेस सादर करण्याचे अधिकार आयुक्त , महानगरपालिका, औरंगाबाद याना प्रदान करण्यात यावेत प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**संवाद :**

श्री.पूरूषोत्तम ठाकूर : २००रूपये स्क्वे.मी. कोणताही नियम लागू होवू नये इमारत धारक बांधकाम करून त्यांचेकडे पैसे नसतात. जनहिताचा विचार करून हा प्रस्ताव मंजूर करावा.

सौ.रजनी जोशी : प्रस्ताव इंग्रजी भाषेत नमूद केलेले आहे मराठीतून देण्यात यावे.

मा.महापौर : यानंतर प्रशासनाने दखल घ्यावी प्रस्ताव हा संपूर्णत: मराठी भाषेतून सादर करण्यात यावा.

श्री.देसरडा प्रशांत : विषय क्र ७ मंजूर करावा प्रस्ताव चांगला आहे.

श्री.भागवत कराड : रेन वॉटर हार्वेस्टींग सीस्टीम मध्ये सर्वासाठी करावे ज्यानी भोगवट प्रमाणापत्र घेतले असेल त्याचेसाठी सूध्दा लागू करावे. जर ही सीस्टीम लावली असेल तर त्या मालमत्तेचा टॅक्स ५टक्के कमी करू म्हणून तसा ठराव सूधदा पारीत केलेला आहे. परत नागरीकांना त्या संबधीची माहिती होण्यासाठी वृत्तपत्राद्वारे माहिती दयावी त्यामूळे शहराचे वॉटर टेबल वाढेल. ज्यांच्या घरासमोर हातपंप असतील त्यास पाणी येईल जेव्हा बांधकाम परवानगी देण्यात येते तेव्हा हा प्रस्तावातील मजकूर मराठीतून करून त्याची प्रत त्या परवाना धारकांना देण्यात यावी.

श्री.रेणूकादास वैद्य : रस्त्यावरील पाण्याचे सूध्दा हार्वेस्टींग करावे त्याचा नकाशा माझ्याकडे उपलब्ध आहे विनंती हे नकाशे मा.आयूक्त यांनी संबधीत अधिका-याकडे दयावे रस्त्यावरील पाण्याचेही हार्वेन्टीग करावे.

मा.महापौर : स.सदस्यांनी चांगली सूचना केलेली आहे याबाबतीत कार्यवाही करता आली तर प्रशासनाने प्रयत्न करावे विषय क्र७ मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, राज्य शासनाच्या निर्देशाप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या शासन मंजुर विकास नियंत्रण नियमावली मध्ये रेन वॉटर हार्वेस्टींग सिस्टीम (Rain Water Harvesting System) बसविणे बाबत अपेन्डीक्स व्ही प्रमाणे तरतुद करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ प्रमाणे फेरबदल करण्यास तसेच अधिसूचना प्रसिध्द करणे, हरकती व सूचना मागविणे तद्नंतर अंतिम प्रस्ताव शासनाच्या मान्यतेस सादर करण्याचे अधिकार मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९/८ :**

सहाय्यक संचालक , नगर रचना , महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद महानगरपालिकेसाठी मंजूर विकास नियंत्रण नियमावली नुसार प्रस्तावीत बांधकामात जिन्याच्या बांधकामाचा (Stair ways) चटई क्षेत्र निर्देशांकात समावेश करण्यात येतो .

औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसारधारण सभेने प्रस्तावीत बांधकामात जिन्याचा समावेश चटई क्षेत्र निर्देशांकात न करणे बाबत ठराव क्रमांक ४६३/३३ दिनांक ०५/०८/२००४ अन्वये ठराव पारीत केला आहे . तथापी सदरचा प्रस्ताव हा अशासकीय असून या प्रस्तावात प्रशासनाचे मत मागविलेले नाही. तसेच सदरील प्रस्ताव हा पूर्वीच्या सर्वसारधारण सभेने पारीत केला असून आता नूकत्याच औरंगाबाद महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूका होवून नवनिर्वाचीत सभासंदांची सर्वसारधारण सभा अस्तिवात आली आहे . या करीता नवीन सर्वसारधारण सभेला या विषयाची माहिती अवगत करूण मान्यता व्हावी या करीता प्रशासकीय प्रस्ताव खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे .

## MODIFICATIONS

| S.R.No. | Rule No | Proposed Modification |
|---|---|---|
| 01 | 15.4.2 | After Provision [i] in bylaws No. 15.4.2 a new provision **" [j] Common Stairways** with imposing one time premium for the area covered by the common staiways at the rate of current ready reckoner of open land value " shall be added |

वरील प्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेसाठी शासन मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत , महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम - ३७ अन्वये फेरबदल करण्याच्या प्रस्तावास मान्यता व्हावी व प्रस्तावाच्या मान्यतेनंतर अधिसूचना प्रसिध्द करणे, हरकती व सुचना मागवून तद्नंतर अंतिम प्रस्ताव शासनास सादर करण्याचे अधिकार आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना देण्यात यावेत , प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**संवाद :**

श्री.पुरूषोत्तम ठाकूर : इतर महानगरपालिकेत काय परीस्थितीआहे माहिती देण्यात यावी.

श्री.बारवाल गजानन : माझ्या माहिती प्रमाणे इतर महापालिकेत ही सिस्टीम लागू आहे प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नसावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: सिडकोने १७०० रूपये दर फिक्स ठवलेले आहे

मा.महापौर : लॉबी व पॅसेजसाठी रू.१२००/- प्रती चौ.मी.प्रमाणे प्रीमियम आकारणी करण्यास आणि प्रीमियमच्या रक्कमेत दरवर्षी १०% वाढ करण्यासह मंजूर करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेसाठी शासन मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत, नियम क्र.१५.४.२ नंतर कॉमन स्टेअर केस लॉबी व पॅसेजसाठी रू.१२००/- प्रती चौ.मी. प्रमाणे प्रीमियम आकारणी करणे आणि दरवर्षी १०% या प्रमाणे प्रीमियमच्या दरात वाढ करून प्रीमियमची आकारणी करणे अशी दुरूस्ती करणेसाठी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम - ३७ अन्वये फेरबदल करण्यास तसेच अधिसूचना प्रसिध्द करणे, हरकती व सुचना मागवून तद्नंतर अंतिम प्रस्ताव शासनास सादर करण्याचे अधिकार मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०/९ :**

कार्यकारी अभियंता (ड्रेनेज व विद्युत) महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, १६७.०० कोटीच्या एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमा अंतर्गत अमरप्रित ते बीड बायपास रोड पर्यंत करण्यांत येणाऱ्या रस्त्याच्या व रेल्वेगेट वरील ओहर ब्रिज बांधणे करीता रस्त्यामध्ये येणाऱ्या ड्रेनेज लाईन्स, पाणी पुरवठा लाईन्स व पथदिवे रस्त्याच्या कडेस सरकविण्याकरता/स्थलांतरीत करण्याकरीता खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | पाणी पुरवठा लाईन्स स्थलांतरीत करणे | - | रू. २२,५६,९०६=०० |
| ०२. | ड्रेनेज लाईन्स स्थलांतरीत करणे | - | रू. १०,८६,०००=०० |
| ०३. | पथदिवे स्थलांतरीत करणे | - | रू. ३२,००,०००=०० |
| | | **एकूण –** | **रू. ६५,४२,९०६=००** |
| | | **म्हणजेच** | **रू. ६५,४२,९१०=००** |

करीता रू.६५,४२,९१०=०० खर्चास मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.अब्दूल रशिद खॉन : रस्त्यासाठी महानगरपालिकेस खर्च येणार आहे या संदर्भात टोलटॅक्स आकारणी केल्यास महानगरपालिकेची भूमिका काय आहे.

मा.आयूक्त : १६७ कोटीचे प्रपोजल आहे ७९ कोटी हे वेगवेगळया विभागाकडून येणार होते उर्वरीत टोल टॅक्सने वसूल करणार होते १६७ कोटीमधे कोणकोणते रस्ते करणार हे २००१ मधे फायनल झालेले असून हे रस्ते हे रस्ते जवळपास २.५० ते ३.०० कोटीचे आहेत महापालिका फक्त त्या रस्त्याखालील असलेली सर्वीस लाईन शिफ्ट करणार आहे. रस्त्याचे बांधकाम रस्ते विकास महामंडळ करतील आणि टोल टॅक्स घेतील.सर्वीस लाईन शिफ्ट करण्यास ४-५ कोटी खर्च येत असेल तो करावा लागेल.ते केले तर १०० कोटीचे रस्ते होतील.

श्री.अब्दूल रशीद खॉन :जागा महानगरपालिकेची राहील. टोलटॅक्स आकारणी केल्यास त्यात महानगरपालिकेचा हिस्सा असावा, आरटीओ विभागाकडून महापालिकेस हिस्सा मिळतो

मा.आयुक्त :टोल टॅक्स लाउनच रस्ते करणार आहे, चार कोटी खर्च आला असता त्याऐवजी ६५ लक्ष खर्च होत आहे संबधीतानी येणा-या २०वर्षात किती पैसे टोलनाक्यामधून येतील याचा अंदाज लावलेला आहे त्यानूसारच खर्च करणार आहे.

श्री.भागवत कराड : शासनाने हा रस्ता मंजूर केलेला असून प्रशासनाने प्रस्ताव ठेवला असून तो मंजूर करण्याची गरज आहे.हा रस्ता महत्वाचा आहे शहानूरमिया दर्गाची जी वेस आहे त्या वेसच्या बाजूला एक पूल करण्याची गरज आहे कारण एमएसआरडीसी ने हा पूल बाधंणार कधी याची कल्पना नाही तेथे बाजार भरतो वाहतूकीची कोंडी होते मागील अर्थसंकल्पात यासाठी ४० लक्ष तरतूद होती त्यात आणखी ६५ लक्ष त्यात जमा करून पूल करण्यात यावा.

मा.आयूक्त : टेंडर इ. सर्व तयार आहे सर्वीस लाईन शिफ्ट केल्या नाही म्हणून तो पूल झालेला नाही.

श्री.भागवत कराड : या संदर्भात सौ.साधना सूरडकर उपमहापौर असतांना बैठक घेतली होती त्या बैठकीतून काही निष्पन्न झाले नाही, दर्गाच्या बाजूला वेस आहे तेथे वन वे रस्ता करून पूल करण्यात यावा.

मा.आयूक्त :पूलासह रस्ता तयार करून देणार आहे.

मा.महापौर : प्रस्ताव मंजूर करण्यात येत असून सदर ब्रिजच्या बाबतीत मा.आयूक्त यांनी एमएसआरडीसी या विभागाशी चर्चा करून तसा प्रस्ताव लवकरात लवकर मंजूर करून घेण्यासाठी शासनाकडे योग्य ती कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अमरप्रित ते बीड बायपास रोड पर्यंत करण्यांत येणाऱ्या रस्त्याच्या व रेल्वेगेट वरील ओहर ब्रिज बांधणे करीता रस्त्यामध्ये येणाऱ्या ड्रेनेज लाईन्स, पाणी पुरवठा लाईन्स व पथदिवे रस्त्याच्या कडेस सरकविण्याकरता/स्थलांतरीत करण्याकरीता येणाऱ्या र.रू. ६५,४२,९१०=०० खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## पूरवणी विषय

**विषय क्र.४१/१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, एन-११,यादवनगर,नवनाथनगर, नवजीवन कॉलनी, द्वारकानगर या परिसरात साधारण ३ ते ४ की.मी.लांबुन पाणी पुरवठा होतो त्यामूळे पाणी कमी दाबाने येते तर काही ठिकाणी पुरवठाच होत नाही त्यामूळे नागरीकांना पाण्यासाठी इतरत्र जावे लागते. तरी या परिसरातील

नागरीकांना मुबलक प्रमाणात पाणी मिळावे करीता यादवनगर परिसरात मनपातर्फे एक पाण्याची टाकी बांधण्यात यावी, करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सूचक : ०१. श्री.भाऊसाहेब ताठे, ०२.श्री.काशिनाथ कोकाटे

अनुमोदक : ०१. श्री.डॉ.भागवत कराड, ०२. श्री.भगवान घडमोडे

सौ.रजनी जोशी : पाण्याची टाकी बांधता येते का ?

मा.महापौर : तांत्रिक बाब तपासून प्रशासनाने कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,एन-११, यादवनगर,नवनाथनगर,नवजीवन कॉलनी, द्वारकानगर परिसरात पाण्याची टाकी बांधण्या संबंधी तांत्रिक बाबींची तपासणी करून आवश्यक ती कार्यवाही करणेस सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

**विषय क्र.४२/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, माझ्या वार्डातील मोहल्ला दादा कॉलनी (दत्तनगर) या ठिकाणी मनपाचे आरोग्य केंद्र असून सदरील आरोग्य केंद्र वार्डाच्या अंतीम बाजूस असल्याने लोकांना त्याचा उपयोग घेता येत नसल्याने सदर आरोग्य केंद्र मनपाची जूनी व बंद असलेली वाचनालय संजयनगर या ठिकाणी स्थलांतरीत करण्यात यावा, ज्यामूळे वार्डातील गरीब रहिवासी यांना ह्या आरोग्य केंद्राचा उपयोग घेता येईल.

तरी सदरील प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सूचक : श्री.अशरफ मोतीवाला अनुमोदक : १.श्री.तरविंदरसिंग धिल्लन, २.श्री.मोहमंद जावेद कुरेशी

मा.महापौर : प्रस्ताव नामंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव सर्वानुमते नामंजूर करण्यांत आला.

या बरोबर ''राष्ट्रगिताने '' सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

नगरसचिव

महानगरपालिका औरंगाबाद